म ग्रं सं वाचनालय शाखा ठाणे
विषय कथा
दा क्र १८६०
IRBK-0101860
IRBK-0101860
IRBK-0101860

# ठिणग्या आणि टिकल्या

[ लघुकथासंग्रह ]

: लेखक :

मा. कृ. शिंदे

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. १८६० नों. दि ........
वि. कथा क्र. ........

नवभारत प्रकाशन संस्था, मुंबई नं. ४

IRBK-0101860
IRBK-0101860

किंमत ....

: प्रकाशक :
र. दि. देसाई,
नवभारत प्रकाशन संस्था,
मुंबई नं. ४.

झब्बू साहित्यिकांचे कर्दनकाळ
म्हणून प्रसिद्ध असलेल्या
'साहित्य झब्बूशाही विध्वंसक मंडळा'च्या
सर्व सन्मान्य सभासदांच्या चरणीं
**सादर व सप्रेम समर्पण.**

सर्व हक्क लेखकाच्या स्वाधीन.

मुद्रक—
रघुनाथ दिपाजी देसाई,
न्यू भारत प्रिंटिंग प्रेस,
गिरगांव मुंबई नं. ४

# प्रस्तावना

श्री. मा. कृ. शिंदे यांचा हा चिमुकला कथासंग्रह वाचल्याबरोबर जी एक गोष्ट मनावर ठसते ती हीच कीं, श्री. शिंदे हे श्री. मामासाहेब वरेरकरांसारखे मुख्यत्वेंकरून प्रचारवादी लेखक आहेत. त्यांना पटलेल्या मतांचा प्रचार करतांना किंवा समाजांतील ढोंगबाजीवर तीव्र प्रहार करतांना ते तथाकथित कलेचा किंवा तंत्राचा मुळींच मुलाहिजा ठेवीत नाहींत. ‘ विकलेला देव ’ या पहिल्याच कथेंत सनातन्यांचीं डोकीं तिरमिरून जातील, असा हल्ला त्यांनीं देवावर चढविला आहे. देव हा अक्षरशः माणसांचा पाठीराखा आहे,—माणसांच्या पोटासाठी त्यानें आतांपर्यंत कांहींच केलेलें नाहीं, अशा हेटाळणीच्या स्वरांत या कथेचा नायक देवाचें वर्णन करतो, आणि घरांतली देवाची

सोन्याची मूर्ति बाजारांत खुशाल विकून आपल्या उपाशीं पोटाची पूजा बांधतो. देवानें गरीबाची काळजी केली नसून गरीबांनींच आतांपर्यंत देवाची काळजी केली आहे असें शंभूचें तत्त्वज्ञान आहे. ' रानमाणूस ' या दुसऱ्या गोष्टींत एका भाबड्या पण विक्षिप्त माणसाचें शब्दचित्र रेखाटणें हा लेखकाचा मुख्य हेतू असला, तरी गरिबांविषयीं लेखकाला वाटणारा जिव्हाळा आणि समाजांतील विषमते-संबंधींचा तीव्र संताप या गोष्टींत पदोपदीं व्यक्त झाला आहे. कोकणांतून मुंबईस आलेल्या ' रानमाणसा'च्या शहरांतल्या अनुभवांचें वर्णन करतांना नेहमीं डोळ्यांसमोर असूनही सहजासहजीं नजरेंत न भरणारें नागर जीवनांतलें एक महत्त्वाचें सत्य लेखकानें फारच कुशलतेनें मांडलें आहे. तो म्हणतो, " पूर्वी नानूला वाटे, मुंबईतले गरीबगुरीब श्रीमंतांच्या औदार्यामुळें जगत असतील ! पण अनुभव आला तो निराळाच ! बऱ्याच दिवसांच्या अनुभवानें त्याला वाटूं लागलें कीं मुंबईंत गरीबांच्या जिवावरच गरीब जगतो ! अगदीं खरा होता त्याचा अनुभव.

"मुंबईतले श्रीमंत लोक मोठमोठ्या बंगल्यांत नि ब्लॉकांत रहातात. गोरगरीब कांहीं दाराची घंटा वाजवून भिक्षा मागायला जात नाहींत आणि कोणी जाऊंही देणार नाहीं. भिकारी भिक्षा मागतात ती सर्वसाधारण—जवळ जवळ गरीबांच्या चाळींतून ! मग गरीबच नाहीं का गरीबांचा अन्नदाता ? ......"

'देवळांत चमत्कार!' या गोष्टींत देवळासारख्या पवित्र स्थळाचाहि अर्थ किंवा काम यांच्या मोहामुळें माणसें कसा दुरुपयोग करूं शकतात हें लेखकानें दाखविलें आहे. पुजाऱ्यांच्या उत्पन्नाची एक बाब म्हणून देवळें ठेवण्यापेक्षां त्यांच्या धर्मशाळा कराव्या, असा नायकाच्या तोंडून या प्रकारावर लेखकानें तोडगा सुचविला आहे. या गंभीर गोष्टींच्या जोडीला 'स्त्रियांची चळवळ' किंवा 'झुणका भाकर' अशा विनोदी गोष्टीही या संग्रहांत आहेत. पहिल्या गोष्टींत सूचकता आहे तर दुसऱ्या गोष्टींत 'झुणकाराम' आणि 'भाकरबाई' यांच्यातल्या बेबनावा-मुळें पोट प्रांतांत उडालेली खळबळ आणि एरंडेल साहेबांनीं केलेली शांतता यांचें रूपकात्मक वर्णन आहे.

प्रचार हा या गोष्टींचा आत्मा असला तरी काव्यमय किंवा लालित्यपूर्ण स्थळें या संग्रहांत नाहींत, असें नाहीं. 'रान माणूस' या गोष्टींत सूर्य कां उगवतो आणि मावळतो यासंबंधीं नानूनें केलेल्या कल्पना निःसंशय काव्यमय आहेत. श्री. मा. कृ. शिंदे यांच्या या कथा हेतूपूर्ण आहेत आणि ज्या हेतूनें त्यांनीं त्या लिहिल्या आहेत तो साध्य झाला आहे यांत शंका नाही.

ता. २६-४-१९४३ —अनंत काणेकर.

# ठिणग्या आणि टिकल्या !

लघुकथा म्हणजे भावना, कल्पना आणि संवेदना यांच्या चकमकींतून किंवा विचार, मन आणि बुद्धि यांच्या संघर्षांतून उडालेल्या ठिणग्या आणि टिकल्याच नव्हेत काय ? प्रस्तुत संग्रहांत अशाच कांहीं ठिणग्या आणि टिकल्या वाचकांना सादर करीत आहे.

ह्या संग्रहांतील सर्व गोष्टी नवयुग, चित्रा, मौज इत्यादि साप्ताहिकांतून व मराठा, नवजीवनादि मासिकांतून वेळोवेळीं प्रसिद्ध झालेल्या आहेत. 'विकलेला देव' ह्या गोष्टीच्या आधारें मी लिहिलेल्या कथानकाचा 'सच्चा सपना' हा हिंदी बोलपट तयार झाला आहे. त्याचप्रमाणें 'रान माणूस' ह्या गोष्टीचें गुजराथी भाषांतर, येथील 'हिंदुस्तान प्रजामित्र' ह्या प्रसिद्ध गुजराथी साप्ताहिकाच्या दिवाळी अंकांत (१९४२) प्रसिद्ध झालें आहे.

गीतेच्या ७ व्या व १० व्या अध्यायांतील श्री. कृष्णाजी वसुदेव यादव यांच्या आत्मकथनाप्रमाणें सांगायचें झालें तर मी म्हणेन, पहिल्या गोष्टींतील शंभू तो मी. दुसऱ्या कथेंतील नानू तो मी. आणि चवथ्या गोष्टींतील अरुण तोहि मीच. बहुजन समाजाच्या आर्थिक परिस्थितींत होणाऱ्या चढ-उताराचें प्रमाण असेंच चालू राहिलें, तर आणखी पांचपन्नास वर्षांनीं जी एक मंदिरबंदीची क्रांतीकारक चळवळ सुरू होईल किंवा व्हावी असें मला वाटतें, त्यासाठीं पार्श्वभूमि तयार करणें हा माझा हेतु आहे. तोच मला नाद आहे. त्याचे निनाद सर्वत्र उठावेत हीच माझी इच्छा.

तारुण्यानें मुसमुसलेल्या तरुणीच्या टचटचीत स्तनांचीं उन्मादक वर्णनें करून आणि आलिंगनें-चुंबनें खच्चून भरून प्रेमकथा लिहिण्याचें कसब मला साधत नाहीं. तशा प्रेमकथा ह्या संग्रहांत वाचायला मिळणार नाहींत, याबद्दल मी दिलगीर आहें. माझ्या जीवनांतच मी प्रेम अनुभवलें आहे, सांठवलें आहे, आटवलें आहे. म्हणूनच प्रेमकथा लिहून प्रेमवासनातृप्ति करण्याचा करुण प्रसंग माझ्यावर अद्याप आलेला नाहीं.

लघुकथांचें तंत्र माझ्या कथांना तंतोतंत लागू पडतें कीं नाहीं, हें तपासण्याचें काम टीकाकारांचें आहे. त्या तंत्रशुद्ध असतील, तर मी म्हणेन ‘ होय—मी त्या तंत्र-शुद्धच लिहिल्या आहेत. ’ आणि ठराविक तंत्रांत बसत

नसतील तर मी अहंमन्यतेचा दोष पत्करून सांगेन कीं, ' माझें तें स्वतंत्र व नवें तंत्र आहे. ' अर्थात् लघुकथांचा नवीन तंत्रप्रवर्तक होण्याचा मान मला मिळेल, ह्या भीतीनें तरी टीकाकार माझ्या लघुकथांना तंत्रशुद्ध ठरवतील अशी मला आशा आहे.

ह्या संग्रहांतील कांहीं गोष्टी वाचून स्वतःला संस्कृति-संवर्धक समजणारे सोंगाडे सनातनी माझा निषेध करतील हें मी जाणून आहें. आणि त्यांनीं तसा निषेध केला नाहीं तर ते मला भ्याले असें मी समजेन.

असो. ह्या चिमुकल्या संग्रहाला चिमुकलीच अभिप्राय-वजा प्रस्तावना लिहून दिल्याबद्दल श्री. अनंत काणेकर यांचे, मुद्रितें तपासल्याबद्दल श्री. अ. सी. केळूसकर ऊर्फ ' संजय ' यांचे, सुबक छपाईबद्दल श्री. रघुनाथराव देसाई यांचे व मलपृष्ठावरील चित्र काढून दिल्याबद्दल चित्रकार श्री. बाम यांचे आभार मला मानलेच पाहिजेत. शेवटीं ' देवपूजा ' ह्या माझ्या पहिल्या कथासंग्रहाच्या वेळीं ज्याप्रमाणें वाचकांनीं स्वयंस्फूर्तीनें आपापले अभिप्राय मला पत्रांनीं कळविले होते, तसेच आतांहि कळवावे अशी वाचक बंधुभगिनींना विनंति करून तूर्त मी पेन खालीं ठेवतों.

१४ बी, खोताची वाडी,
मुंबई नं. ४
ता. १-५-१९४३

मा. कृ. शिंदे.

# विकलेला देव

" असं काय बरं दादा ?—आधीं हा आपला संसार असा फाटका ! आणि तशांत तूं जर अशी उधळपट्टी करायला लागलास तर कसं बरं भागेल आपलं ? चैन—चैन तरी किती ! "

" ताई, आपल्या परिस्थितीची मला कल्पना नाहीं, असं का तुला वाटतं ? पण—"

एवढेंच बोलून शंभू थांबला. त्याला खूप खूप बोलायचें होतें. पण कां कोण जाणे, त्यानें तोंडाबाहेर पडणारे शब्द तोंडांतल्या तोंडांत आवरले.

त्याला म्हणायचें होतें, " अंथरुण पाहून पाय पसरावे माणसानं, असं मीच नेहमीं तुला शिकवीत होतों ना ? मग तोच मी आज असा तुझ्या मताप्रमाणं चैनी कसा झालों

बरं ! मी अशी चैन कां करतों, याचा तूं कधीं विचार केला आहेस का ? मी सांगतों ताई, तूं त्याचा मुळींच विचार केलेला नाहींस; आणि म्हणूनच मला तूं दोषी ठरवतेस ! ”

“ रक्ताचं पाणी करूनसुद्धां स्वतःच्या बायकामुलांचं पालनपोषण सुखानं करतां येत नाहीं, या भयंकर विचारानं संतप्त झालेला एखादा गिरणींतला मजूर जसा स्वतःच्या डोक्यास थोडीशी कां होईना—पण विश्रांति मिळावी नि क्षणभर तरी जिवाला विरंगुळा वाटावा म्हणून जसा कधीं तरी ताडीच्या पिठ्याची पायरी चढतोच चढतो, त्याच-प्रमाणं ताई, मीहि असा चैनी बनलों आहे बरं ! माझी मनःस्थिति हेंच ह्या साऱ्या चैनीचं मूळ कारण आहे ताई ! सिनेमानाटकं पाहून पोट भरत नसतं. मला हें कळत नाहीं का ? पण अहोरात्र माझ्या भेसूर परिस्थितीचीं भयाण भूतं माझ्या डोळ्यांसमोर नाचूं लागलीं कीं, त्यांच्या तावडींतून थोडा वेळ तरी निसटून जाण्यासाठींच मी तुझ्या श्रमाचे पैसे हे असे अगदीं—अगदीं आंधळेपणानं पेरतों ! ”

पण त्यानें ते शब्द बोलून दाखवले नाहींत. एवढेंच केलें कीं, एक निश्वास सोडला नि म्हणाला—

“...मन बेचैन झालं कीं माणसाला आपोआप चैन आठवते ! ”

शांताला, शंभूचे हे कळवळ्याचे नि अंतःकरणाच्या अगदीं तळघरांतले बोल ऐकून थोडेंसें वाईट वाटलें. उगीच

आपण शंभूचें मन दुखविलें असें वाटून तिला थोडा पश्चात्तापच झाला. पण तिचाहि नाइलाज होता.

शंभू हा तिचा पाठचा भाऊ. आणि म्हणूनच ती त्याला अगदीं तळहातावरच्या फोडाप्रमाणें वागवीत असे. आपल्या आवडीनिवडी पुरवायला आपल्याला आईबाप नाहींत, असें तिनें त्याला कधींच भासूं दिलें नाहीं. उलट शंभूला संतुष्ट ठेवण्यासाठीं तिनें स्वतःच्या सुखावरहि तुळशीपत्र ठेवायला कमी केलें नव्हतें.

आपल्या बोलण्याचा भलताच अर्थ करून, रागाच्या भरांत शंभू कांहीं बरेंवाईट करून घेईल, ह्या भीतीनें ती पुन्हा म्हणाली,—

" दादा, तूं पैसे खर्च करतोस म्हणून नाहीं बोलल्यें मी—म्हटलं जगांत वागायचं म्हणजे जगासारखंच वागलं पाहिजे नाहीं का ? आपली स्थिति काय नि आपण वागतों कसे, याचा विचार नको का करायला ? "

" हें पहा ताई—"

शंभूच्यानें आतां मात्र राहवेना. जखमेवर खारें पाणी जसें झोंबतें तसें शांतेचें बोलणें त्याच्या अंतःकरणाला चरचरून झोंबलें. तो थोडासा चवताळल्यासारखा होऊनच बोलूं लागला.

" जग !—जग ! !...कां म्हणून मी जगाची पर्वा करावी ? जगानं कुठं केली माझी पर्वा ? मग मी तरी असल्या भिकारड्या जगाला कां म्हणून भीक घालावी ?

बस्स ! मी जर जगाचा कोणी नाहीं, तर जगहि माझं कोणी नव्हे ! ”

शंभू मोठ्या आवेशानें आणि करारी वाणीनें एक एक शब्द उच्चारीत होता.

शांता फक्त ऐकत होती.

शेवटीं तो विषय बदलावा म्हणून ती म्हणाली,—

“ दादा, असें चिडून नि संतापून कसं बरं चालेल ?— कोण ऐकणार आहे आपलं ? आहे का कोणी मायेचं माणूस आपलीं गाऱ्हाणीं ऐकायला ? सांग बरं—कुणावर रागावायचं आपण ? वाऱ्याबरोबर का असं भांडत बसायचं खुळ्यासारखं ? वेडा कुठला ! पावसानं भिजवलं नि सूर्यानं तापवलं—कुणाला सांगायची फिर्याद ?—”

शांता त्याचें समाधान करण्यासाठीं म्हणून बोलत होती; तरी त्याचें समाधान न होतां उलट त्याचा मनःसंताप अधिकाधिक वाढतच चालला होता.

स्पिरीटचा दिवा विझविण्यासाठीं म्हणून फुंक मारावी, तों तो अधिकच पेटतो. तसेंच शंभूच्या बाबतींत त्यावेळीं झालें.

शंभूच्या हृदयांतील कालवाकालव नि डोक्यांतील विचा-रांचें काहूर तिनें ओळखलें. थोडासा वेळ तिनें इकडे तिकडे काढला. यावेळीं कांहींच न बोलतां शंभू थोडासा शांत झाला, म्हणजे त्याला काय सांगायचं तें सांगेन, असा विचार करून ती आपल्या कामाला लागली.

शंभूचें मात्र त्यावेळीं, कशाकडेच लक्ष नव्हतें. तो

स्वतःशींच कांहींतरी पुटपटत होता. दांतहि चावायचा मधून मधून.

एकदम भडका उडालेला उत्तम. पण आंतल्या आंत धुमसत राहाणारी आग परिणामीं घातकी असते. हें जाणूनच कीं काय, शांतानें शंभूच्या त्या धुमसणाऱ्या विचार-अग्नीवर हळूच फुंकर मारण्याचा प्रयत्न केला. ती म्हणाली,—

" हें पहा दादा, अशा वेळीं आपण परमेश्वरावरच हवाला घालून राहिलं पाहिजे. तो जसं ठेवील त्यांतच आनंद मानायला शिकलं पाहिजे माणसानं.—"

तिचें बोलणें चालू असतांनाच शंभू म्हणाला,—

" ताई, पुरे झालं तुझं तत्त्वज्ञान ! भरल्या पोटावर ढेंकर देत असतांना, मीहि एके काळीं असंच तत्त्वज्ञान जगाला सांगत होतों. आतां उपाशीं पोटीं हें तत्त्वज्ञान नाहीं पटत माझ्या मनाला."

" अगदीं बरोबर बोललास दादा ! अशा वेळीं असं तत्त्वज्ञान तुलाच नव्हे,—कुणालाच पटायचं नाहीं. पण अशा वेळीं जो तें पटवून घेईल, त्यालाच शेवटीं जय मिळतो. देवच दीनांचा दयाळू आणि तोच गरिबांचा पाठीराखा आहे दादा."

एकाद्या आजीबाईचा आव आणून मुद्दामच शांता शंभूच्या मनावर तसें बिंबवण्याचा प्रयत्न करीत होती. पण शंभू कसला वस्ताद ! तो असल्या पुराणांतल्या वांग्याचें कधींच भरीत करून मोकळा झालेला !

देव गरिबांचा पाठीराखा, हें ऐकून मात्र शंभू मोठ-मोठ्यानें हंसूं लागला.

शांताला आश्चर्य वाटलें त्या हंसण्याचें. चारी बाजूंनीं आकाशांत ढग भरावे, जोराचा पाऊस पडावा, आणि पाऊस पडत असतांनाच कडक ऊन पडावें, असा तिला भास झाला. शंभू असा एकाएकीं कां हंसूं लागला, हें तिला कळेनाच मुळीं.

" कां असा हंसतोस दादा ? " तिनें विचारलें.

" आज तूं तुझ्या देवाचं खरं वर्णन केलंस म्हणून ! "

" माझ्या देवाचं खरं वर्णन ?—कसं ? "

" गरिबांचा पाठीराखा म्हणून म्हणालीस ना ? "

" मग त्यांत काय चुकलं ? "

" चुकलं नाहीं.—अगदीं बिनचूक आहे तें ! "

" मग हंसतोस कां तर ? "

" एवढ्यासाठींच कीं, जी गोष्ट मी तुला सांगणार होतों, तीच गोष्ट तूं स्वतःच्या तोंडानं कबूल केलीस म्हणून ! "

तरीहि शांताला त्याच्या म्हणण्याचा उलगडा होईना. शंभू मात्र सारखा हंसत होता. आणि ती आश्चर्यानें त्याच्या तोंडाकडे पहात होती.

" काय कबूल केलं मी ?—स्पष्ट सांग ना रे दादा. "

" सांगूं ताई,—तूं मला वेडा म्हणतेस; पण तूं मात्र माझ्यापेक्षांहि वेडी आहेस खास !—अग तूंच नाहींस कां

आतां म्हणालीस, कीं देव गरिबांचा पाठीराखा असतो म्हणून ?"

"हो !—बरं मग ?"

"मग काय ?—असल्या देवावर कोण बरं कसा विश्वास ठेवील ? जो देव पोट न राखतां गरिबांची फक्त पाठच राखतो, असा कुचकामी देव हवा कोणाला ? तुला खरं सांगू का ?"

"काय ?" तिनें विचारलें.

"देवानं गरिबांची काळजी केली नसून गरिबांनींच आतांपर्यंत देवाची काळजी केली आहे. गरीब जगांत नसते, तर देवाला कुणीच विचारलं नसतं !"

"कांहींतरी बडबडतोस झालं ! जगांत श्रीमंत आहेत म्हणून देव आहेत. श्रीमंतांनींच लाखों रुपये खर्चून हीं देवळं बांधलीं ना ?"

"होय. श्रीमंतांनींच हीं देवळं बांधलीं. पण तीं गरिबांना आणखी नागवण्यासाठीं बांधलीं. गरिबांचे गळे कापून मिळविलेल्या पापाच्या पैशांचा उपयोग त्यांनीं देवळं बांधण्यासाठीं केला. पापाचं परिमार्जन करण्याचा तो एक मार्ग आहे, समजलीस ? शिवाय तोहि एक श्रीमंतांचा धंदा आहे. त्याहि धंद्याच्या कचाट्यांत नेमके गरीबच सांपडतात !—दुर्दैवी बिचारे !!" त्यानें उत्तर दिलें.

"मग तुला काय म्हणायचं आहे ?"

"मला एवढंच म्हणायचं आहे कीं, मी देवावर

विश्वास ठेवीन; पण पोटराखा देव असला तर ! पाठीराखा देव असला तर तो नालायक देव तुझा तुलाच लखलाभ होवो ! दर्शनहि घेणार नाहीं तुझ्या त्या देवाचं ! म्हणे पाठी–राखा देव ! ! तुझ्या या पाठीराख्या देवानं गरिबांच्या अक्षरशः पाठीच राखल्या. पोट राखायची कुवत कांहीं तुझ्या देवाला नाहीं."

असें म्हणून शंभू मोठमोठ्यानें हंसूं लागला. पण त्या हंसांत विनोद नव्हता, उपहास होता. आनंद नव्हता, तिरस्कार होता.

देवाचा उल्लेख होतांच शंभू शांताची अशी उपहासात्मक थट्टा कां करूं लागला, यालाहि थोडेंसें कारण होतें.

शांता नि शंभू हीं दोन भावंडें पूर्वी एका खेड्यांत रहात होतीं. त्यांचे वडील त्या गांवचे पाटील होते. अर्थात्‌च त्यांचें बालपण चांगलें सुखांत गेलें होतें, हें निराळें सांगायची आवश्यकता नाहीं.

शांता सरासरी बारा वर्षांची नि शंभू नऊ वर्षांचा असतांनाच त्यांचे आईबाप कसल्याशा सांथीनें मरण पावले. त्यांना जवळचें माणूस म्हणून फक्त एक चुलताच काय तो शिल्लक राहिला.

पण—

भुकेलेल्या माणसाला अन्न मिळतांच तो जसा बकाबक तें खाऊन टाकण्याचा प्रयत्न करतो, त्याचप्रमाणें कांहींसा प्रकार ह्या त्यांच्या चुलत्याच्या बाबतींत झाला.

वडील भावाचा—शांता-शंभूच्या वडिलांचा धाक होता, तोंपर्यंत हे राजश्री व्यवस्थित होते. परंतु ते दिवंगत होतांच सगळा पैसाअडका आयताच ह्याच्या हातांत आल्यामुळें कानांत वारें भरलेल्या एकाद्या वांसराप्रमाणें त्यानें गूण उधळायला सुरवात केली.

एकदोन वर्षांतच होतें नव्हतें तें नाना प्रकारच्या व्यसनांत उडवून शेवटीं त्यानेंहि राम म्हटलें.

पोरांच्या आंगाखांद्यावरचा खिडुकमिडूकसुद्धां शिल्लक राहिला नव्हता.

नाहीं म्हणायला देवाच्या देव्हाऱ्यांत एक सोन्याची बाळकृष्णाची मूर्ति शिल्लक होती. बाकी सगळें म्हटल्या सगळें त्यानें फुंकून टाकलें होतें.

चुलत्यामागें शांताशंभूला सुखाचा घांस मिळणेंहि मोठें कठीण होऊं लागलें. तशाच बिकट स्थितींत त्यांनीं त्याच गांवांत आणखी कांहीं वर्षें काढलीं.

इतक्या हालअपेष्टा होत्या, तरी शांतेच्या देवपूजेंत कांहीं खंड पडत नसे. उलट जों जों परिस्थिति जास्त जास्त बिकट भासूं लागली, तों तों शांताचें पूजा-प्रकरण जास्त जास्त वाढूं लागलें.

शंभूचा स्वभाव जरासा वेडसरच होता पहिल्यापासून ! त्याला नव्हतें तें शांताचें प्रस्थ आवडत. तो पहिल्यापासून शांताला म्हणायचा,—

" ताई, कसली करतेस पूजा ? इकडे लोक आपली पूजा

करीत असतांना देवाची पूजाच करीत बसतेस, याला म्हणावं तरी काय ?"

त्यावर ती म्हणे—

" तुला नाहीं ना त्याचा त्रास होत ?—अरे आज ना उद्यां तो देवच पावेल आपल्याला नि आपण सुखी होऊं."

हें वळण तिच्या आईनेंच तिला लहानपणापासून लावल्यामुळें पुढें तर तिला तें सोडतांच येईना. कारण तीच आतां वडील. मात्र त्या गांवांत अब्रूनें जगणें दिवसें-दिवस तिला कठीण वाटूं लागलें.

गरिबाला गोत नसतें असें म्हणतात, तें तिला पावलो-पावलीं प्रत्ययाला येऊं लागलें.

गांवांतल्या गांवगुंडांनीं शांताला आपल्या जाळ्यांत ओढून तिच्या तारुण्याचा नि सौंदर्याचा लिलाव पुकारण्याचा कट केला. चारी बाजूनीं दैव कसें हात धुवून मागें लागलें त्यांच्या !

शेवटीं तिनें निश्चय केला आणि त्या नरकांतून बाहेर पडण्यासाठीं, कुणाचीशी सोबत पाहून शंभूसह मुंबईत प्रवेश केला.

मुंबईत गेल्यावर काबाडकष्ट करून चार पैसे मिळवतां येतील, अशी शंभूलाहि खात्री होती.

मुंबईला आल्यावर शंभूनें नोकरीसाठीं खटपट चाल-विली. पण त्याचा व्हायचा तोच परिणाम झाला. शेवटीं

शेवटीं कंटाळलाच तो जिवाला! आपण होतों कोण नि झालों कोण याच विचारांनीं त्याला जेरीस आणलें.

नाहीं म्हणायला त्याला मातीच्या मूर्ति करायचा नाद होता. तोच शेवटीं त्याच्या उपयोगी पडला.

लौकरच गणेशचतुर्थी येणार होती म्हणून जिकडे तिकडे गणपतीचे कारखाने सुरू झाले होते. त्यांपैकींच एका कारखान्यांत गणपतीचे डोळे उघडायचें काम त्याला मिळालें.

त्याला त्या कामाची मोठी गंमत वाटली. तो शांताला म्हणाला, " पाहिलंस ताई, मी आतां साधासुधा माणूस राहिलों नाहीं वरं का! मी आतां देवांचाहि देव बनलों आहें. प्रत्यक्ष देवाचेहि डोळे मी उघडतों.—देवालाही मी दृष्टि देतों!"

त्यावर ती म्हणाली—" आहे मला ठाऊक! तूं देवाचे डोळे उघडीत असलास तरी तुझे मात्र डोळे अजून उघडले नाहींत."

तें ऐकून शंभू खो-खो हंसला. बहिणीच्या बोलांची भावाला जितकी गंमत वाटावी तितकी त्याला वाटली.

शंभूला नोकरी मिळाली तशी त्याच दरम्यानं शांताचेंहि सौंदर्य एका कलावंताच्या नजरेंत भरून, त्यानें तिला आर्ट स्कूलमध्यें मॉडेल म्हणून बसायची नोकरी देवविली.

शांता तशी कांहीं फारशी देखणी नव्हती. पण तिचे अवयव मात्र अगदीं जिथल्यातिथें नि रेखीव होते. नीटस नाकडोळे, गोंडस शरीरयष्टि, ठसठशीत बांधा नि मध्यम

उंची हेंच तिचें सौंदर्य. पण चित्रकारांना लागणारा 'कट्'
तिच्यांत होता.

नोकरी मिळाली—दिवसाला दीड रुपया वेतन मिळणारी नोकरी मिळाली, त्या दिवशीं तिला अतिशय आनंद वाटला.

पण—

तिला ती नोकरी आवडेना. शेंकडों स्त्रीपुरुषांत ते सांगतील तसे आविर्भाव करून, कधीं नग्न तर कधीं अर्धनग्न अशा स्थितींत बसायचें अगर उभें राहायचें, हें कुठल्या सभ्य मुलीला आवडेल ?

तिचा आनंद क्षणिक ठरला ! दोनच दिवस मॉडेल म्हणून मोठ्या नाइलाजानें बसून तिनें त्या आर्ट स्कूलला कायमचा रामराम ठोकला.

शंभूची नोकरी तरी काय ?—आळवावरचें पाणी ! गणेशचतुर्थी झाली आणि शंभूची नोकरी सुटली. गणपती पाण्यांत गेले तसे शंभूचे श्रमहि पाण्यांत गेले. कारण नोकरीचे कांहीं पैसे मिळाले कांहीं पैसे बुडाले नि कारखानेहि बंद झाले !

तितक्या अवधींत त्यानें देव्हाऱ्यांतल्या देवासारखी एक मातीची मूर्ति करून व तिला सोनेरी रंग चढवून, अगदीं खऱ्या सोन्याच्या मूर्तिसारखीच एक केली होती.

शांता मुंबईस आली तेव्हां तिनें आपला देव्हाराहि बरोबर आणलाच होता. त्यांच्याकडे सोन्याची मूर्ति आहे

हें कोणालाच ठाऊक नव्हतें. आणि जरी कोणाला कळलं असतं, तरी असल्या भिकारड्यांकडे सोन्याची मूर्ति असेल हें कोणाला खरेंहि वाटलें नसतें! ज्यांनीं ज्यांनीं ती मूर्ति पाहिली होती, त्यांना त्यांना ती पितळेची असेल, असें वाटत असे.

एके दिवशीं अचानकपणें शंभू स्वतःसाठीं व शांतासाठीं बरेचसे कपडे, अत्यावश्यक असे कांहीं दागिने, कांहीं संसारी भांडीं आणि इतर थोडेंसें सामानसुमान घेऊन आला.

शांता तें पाहून थक्कच झाली! तिला वाटलें, शंभूला कोठें तरी मोठ्या पगाराची नोकरी मिळाली आणि त्यानें आगाऊ कांहीं रक्कम घेऊन हें सारें सामान आणलें असावें!

शंभू अंगदीं आनंदांत दिसत होता. आणि तो शांतालाहि आनंदी बनण्याचा आग्रह करीत होता.

तिला त्या साऱ्या प्रकाराचा अचंबाच वाटला! तिनें त्याला विचारलें,—

" दादा, हें सारं कसं आणलंस? कुठले आणलेस एवढे पैसे इतक्या जिनसांना?"

" ताई, हें तूं निदान आज तरी मला विचारूं नकोस! एक दिवस तरी असूं दे मला जरा आनंदांत! दारिद्र्य—दारिद्र्य आहेच जन्मभर आपल्या वांट्याला!"

" नाहीं—दादा, सांग सांग! कुठून आणलंस तूं हें सारं?" ती अधीकच घाबरून गेली. कारण आपली समजूत खोटी असेल, असा तिला संशय आला.

"कुणी दिलं हें तुला ?" तिनें अगदीं अधीरतेनें विचारलें.

"कुणी दिलं ?—तुझ्या देवानें !" शंभूनें हंसत हंसतच उत्तर दिलें. "देव पावला नि त्यानं आपल्याला हें दिलं ! देव गरिबांचा पाठीराखा असतो ! !" शंभूनें परत खोंचून उत्तर दिलें.

शंभूला मोठ्या पगाराची नोकरी मिळाली असेल वगैरे वगैरे कल्पना खऱ्या असाव्यात असें तिला परत वाटूं लागलें. थोडासा आनंद, थोडीशी भीति यामुळें ती अगदीं गोंधळून गेली होती. काय करावें तें कळेनाच थोडा वेळ तिला. शेवटीं ती खरोखरच देवाची कृपा असेल असें समजून, सारें सामान जिथल्या तिथें टाकून लगबगीनें आधीं देव्हाऱ्याकडे धांवली.

शंभूहि तिच्या मागोमाग हळुहळू गेला.

शांता हात जोडून देवापुढें बसलेली त्याला दिसली. ती अत्यंत घाबरलेली दिसली त्याला. अगदीं स्तब्ध होती देवाकडे टक लावून. डोळयांवाटे अश्रूधारा वहात होत्या. तिच्या त्या वेळच्या दृष्टींत भूतकाळच्या साऱ्या स्मृती सांठलेल्या होत्या.

"ताई, एकसारखी किती टक लावून पहातेस देवाला ?" शंभूनें विचारलें.

त्याच्या प्रश्नानें तिची स्मृति—समाधी भंग पावली.

"खरंच किती वेडी मी !" डोळे पुशीत पुशीत तिनें उत्तर दिलें. अश्रूरहित नजरेनें पुन्हा एकदां तिनें देवाकडे पाहिलें.

ती दचकली नि तिनें एकदम झटक्यानें मागें वळून शंभूला विचारलें,—

" दादा, आपला देव कुठं ? "

" म्हणजे ?—हा काय देव्हाऱ्यांत ! " देवाकडे बोट दाखवून शंभूहि तितक्याच घाईघाईनें उत्तर देऊन, तिथून काढता पाय घेण्याचा विचार करूं लागला.

शांताला संशय आला त्याचा. तिनें ती मूर्ति हातांत घेतली, तोंच तिच्या हातांत देवाची मान मोडून पडली. शांता चपापली—बावरली. धस्स झालें तिच्या काळजांत !

" दादा—! ! " विस्फारित नजरेनें शंभूकडे पहात ती एकदम ओरडली !

" दादा—दादा, आपली सोन्याची मूर्ति कुठं आहे रे ? काय केलंस तूं त्या मूर्तीचं ? " ती ढळढळां अश्रू ढाळूं लागली. शंभू तटस्थ होता.

" बोल ना रे दादा, देव कुठं आहे ? "

" तुझ्या हातांत ! "

" हा देव—हा मातीचा देव ? "

" हें पहा ताई, देव म्हणजे देव ! सोन्याचा असला तरच तो देव नि मातीचा असला तर तो देव नव्हे, असं कुणी सांगितलं तुला ? वेडी कुठली ! "

शंभू अगदीं कांहींच झालें नाहीं असें समजून बोलत होता. शांता मात्र ओक्साबोक्सी रडत होती.

" दादा, भलत्या वेळीं कशी रे थट्टा सुचते तुला ? सांग रे, देव कुठं आहे ? " तिनें रडत रडतच विचारलें !

" ताई, तुझा देव गरिबांच्या पाठी राखायला गेला आहे; आणि माझा देव हा पहा असा गरिबांचीं पोटं राखायला धांवून आला आहे. "

खुळकन् फाटक्या सदऱ्याच्या खिशांतले रुपये वाजवीत शंभूनें उत्तर दिलें. त्याच्या अंगांत त्यावेळीं कांहींतरी संचारलें असावें, असाच त्यावेळीं त्याला पहाणाऱ्यांना भास झाला असता ! शांताची समजूत घालण्यासाठीं म्हणून तो म्हणाला,—

" ताई, हें पहा अशी रडूं नकोस. तूं आजपर्यंत कुठल्या देवाची पूजा करीत होतीस तें आज मला कळलं. तूं पूजा करीत होतीस ती देवाची नसून सोन्याची होती. होय ना ? देवाचीच पूजा करायची, मग सोन्याची मूर्ति काय किंवा मातीची मूर्ति काय, दोन्ही सारखंच ! तूं कष्टी झालीस ती देवासाठीं नसून सोन्यासाठीं झालीस ! सोनं गेलं म्हणून तूं रडतेस, होय ना ? "

मातीची मूर्ति फेंकून एका कोंपऱ्यांत जाऊन शांता रडतच होती. शंभू तिच्याजवळ जाऊन बसला नि म्हणाला,—

" हें पहा—ताई हें पहा त्या देवानं आपल्याला किती रुपये दिले ते ! " असें म्हणत त्यानें त्या नोटा नि रुपये तिच्या पुढयांत फेंकले.

" या पैशांनीं आपण काय करणार नाहीं ताई ! इतकं भांडवल यापूर्वी मिळालं असतं, तर असे हाल काढण्याची पाळी आपल्यावर खात्रीनं आली नसती ! स्वतःच्या बेंबींत कस्तुरी असतांना, कस्तुरीच्या वासासाठीं रानच्या रानं पोटाखालीं घालणाऱ्या कस्तुरी–मृगासारखी आपली गोष्ट झाली. यापूर्वींच ती मूर्ति विकण्याची सुबुद्धि मला झाली असती, तर किती छान झालं असतं ! ताई, चल उठ. पूस आधीं ते डोळे. आतां लौकरच गणेशचतुर्थी येणार आहे. या भांडवलानं मी स्वतः आतां गणपतीचा कारखाना काढतों. "

शंभूच्या प्रत्येक शब्दानें शांताच्या मनावर कसला तरी आघात होत होता. त्याचे ते हिंमतीचे बोल ऐकून शेवटीं तिचें दुःख ओसरलें !

दिवसामागून दिवस गेले.

शंभूनें गणपतीचा कारखाना सुरू केला.

त्याच्या कौशल्यामुळें मूर्तिकार म्हणून त्याचा नांवलौकिक वाढूं लागला. होतां होतां मातीच्या मूर्ति करणाऱ्या शंभू-कडे राजेरजवाड्यांच्या लहानमोठ्या पुतळ्यांच्याहि ऑर्डर्स येऊं लागल्या.

नाहीं नाहीं म्हणतां म्हणतां त्यानें बरीच माया जवळ केली.

* * *

आतां—

शांता अर्थात्च सुखी आहे, यांत शंका नाहीं. उलट मुंबईतच कुठें तरी एकादी लहानशी बिल्डिंग बांधावी, याच विचारांत सध्यां ती आहे. विकलेल्या देवाबद्दल आतां तिला वाईटहि वाटत नाहीं नि त्याची आठवणहि नाहीं.

शेजारच्या बायका रोज संध्याकाळीं देवळांत जात असतांना तिला दिसल्या कीं ती स्वतःशींच म्हणते,—"डॉ. आंबेडकरांनीं मंदिरप्रवेशाची चळवळ चालवली होती, तशी मंदिरबंदीची चळवळ कुणी सुरू कां करीत नाहीं !"

# रानमाणूस

मुंबई कांहीं त्यानें अजून पाहिली नव्हती. पण मुंबई कशी असेल, याची त्याला कमालीची कल्पना होती. मुंबई-च्या स्वरूपाविषयीं अनेक आराखडे नि अंदाज त्यानें अगोदरच आंखून ठेवले होते.

मेल्याशिवाय स्वर्ग दिसत नाहीं, असें म्हणतात! मेलेला माणूस कांहीं स्वर्ग कसा आहे तें सांगायला परत येत नाहीं. तरीसुद्धां स्वर्गातल्या नंदनवनाची, यक्षगंधर्वांचीं नि अप्सरा-पऱ्यांचीं रंगेल वर्णनें कवींनीं केलींच कीं नाहीं? ते कुठे गेले होते स्वर्ग पहायला?

आमच्या नानूचीं मुंबईविषयीचीं कल्पनाचित्रें तशींच होतीं. प्रत्येक माणूस किंचित् कवि नसतो का?

नानूच्या कल्पनासृष्टींतली मुंबई इतकी वैभवशाली होती,

कीं कवीच्या कल्पनासृष्टींतील नंदनवनसुद्धां तिची बरोबरी करूं शकलें नसतें.

*　　　*　　　*

आज तो प्रथमच मुंबईला आला होता. भाऊच्या धक्क्यावरून आपल्या मामाच्या घरीं—गिरगांवांत येईपर्यंत अनेक दृश्यें दिसलीं त्याला. तो कल्पनासृष्टींतल्या मुंबईशीं प्रत्यक्ष मुंबई पडताळून पाहूं लागला.—आणि काय असेल तें असो, त्याला त्यांत विलक्षण साम्य दिसूं लागलें.

गाजरपारखी जगाची पारख पूर्णपणें नसलेला नानू, खुशींत गाजरें खाऊं लागला. जाळण्यासाठीं म्हणून नेत असलेल्या प्रेताला उन्हाचा त्रास होऊं नये, म्हणून त्याच्यावर छत्री धरणारे लोक किती दयाळू असतील याची त्यानें मनाशीं कल्पना केली. आणि स्वतःला धीर देत स्वतःशींच म्हणाला,—

" वेड्या नानू, घाबरूं नकोस ! इतक्या हळव्या अंतःकरणाचीं हीं देवमाणसं तुला—एका जिवंत माणसाला दूर का लोटतील ?

व्हिक्टोरियाचा घोडा भरधांव धांवत होता. नानूचें आशाळू मन घोड्यापुढें धांवत होतें.

एकाद्या धर्मशाळेंत उतारू येतात नि जातात, तसेच नानूच्या डोक्यांतहि नाना विचार येत नि जात. अशा अनंत विचारांची अखंड ये-जा चालू असतांनाच नानू मामांच्या बिऱ्हाडीं येऊन पोंचला.

" मामा—" नानूनें हांक मारली.

आंतून ' ओ ' आली नि मामा दरवाजा उघडून बाहेर आले. लगेच वरपांगीं आनंदाचा आविर्भाव आणून त्यांनीं खुशाली बिशाली विचारण्याचा औपचारिक विधी उरकला. पण नानू आलेला पाहून मात्र त्यांना कसेंसेंच झालें. कारण नानू त्यांच्या ऐटबाज डामडौलाला शोभण्यासारखा नव्हता. मामांच्या घरांतला ' रामा ' गडीसुद्धां एकादा ऑफीसर दिसला असता ! त्यांच्या दृष्टीनें नानू रानटी—अगदीं रानमाणूस !

अर्थात् असला इरसा़ल अवतार—भाचा असला म्हणून काय झालें ?—मामांना आपल्या घरांत ठेवून घेणें लाजीर-वाणें वाटलें. आणि मग—

"......काय सांगणार नानू, तूं अशा चमत्कारिक वेळेला आलास कीं, कांहीं विचारूं नकोस ! आमच्या या बिल्डिंगमध्यें आहे टायफॉईडची सांथ ! आणि टायफॉईड म्हणजे काय ?—बोलून चालून स्पर्शजन्य ताप तो !...... तशांत तूं परगांवहून आलेला !......न जाणो काळ वेळ कांहीं सांगून येत नाहीं. म्हणून म्हणतों—अशा धोक्यांत तूं राहूं नये हें बरं. दुसरीकडे कुठं तरी तुझी सोय कर. बाबा—जीव सलामत तर सगळं......"

नानूच्या जिवाची काळजी करण्याचा फार्स करून त्याची धिंडका कशीतरी एकदां घालवून देण्यासाठीं, मामांनीं धडधडीत थाप मारली.

पण नानू कसला विलंदर! त्याच मामांचा भाचा तो!! त्यानें मामांचा इरादा ओळखला, नि त्यानेंहि मामांना चार गोष्टी सुनवल्या. होतां होतां तूं मी झालें नि शेवटीं श्रीमंत मामानें गरीब भाच्याला चहाचें पाणीहि न देतां हांकलून दिला.

बोचकें हातांत घेऊन नानू निघाला.

पण 'आतां कुठं जायचं?' हा प्रश्न त्याच्यापुढें दत्त म्हणून उभा राहिला. ना कोणी ओळखीचें ना देखीचें! त्याला वाटलें—आपल्या माणसांनीं परकेपणा दाखवल्यावर परकी माणसें आपलेपणा कशीं दाखवतील?—ब्रह्मांड आठवूं लागलें त्याला. अशा विचारतंद्रींत एक एक पाऊल टाकीत असतांना त्याचें एक मन त्याला दोष देत म्हणालें,—

"छे—चूक झाली! मामांना उलट बोलणं हें कांहीं बरं नाहीं. लहान तोंडीं मोठा घांस घेतांना थोडा तरी विचार करायला हवा होता. वडील माणसं बोलतात तें आपल्या हितासाठींच ना?"

पण लगेच त्याचें दुसरें मन म्हणालें,—

"कसलीं माणसं नि कसलीं वडील माणसं! झालं तेंच योग्य झालं! माणसांत माणूसकी निर्माण करण्यासाठीं माणूसकीसुद्धां सोडली पाहिजे माणसानं!"

इतक्यांत—

"नानू—" कुठून तरी ओळखीच्या आवाजाची हांक नानूच्या कानीं आली.

त्यानें मागें वळून पाहिलें. ती हांक रतनची होती.

" रत—न ! " थोड्याशा भांबावलेल्या स्थितींत नानू आनंदानें उद्गारला !

" नानू, तूं इकडं कुठं आलास ? " रतननें नानूची विचारपूस करायला सुरवात केली. नानूनेंहि झालेला सर्व वृत्तांत तिला सांगितला. रतनचें अंतःकरण दयेनें पाझरलें. ती त्याला म्हणाली,—

" कांहीं हरकत नाहीं.—तूं चल माझ्याकडे." ती त्याला आपल्याकडे घेऊन गेली.

त्या दिवसापासून तो रतनच्या खोलींत राहूं लागला.

" परकी माणसंच प्रसंगीं आपलीं होतात ! " त्याचें मन त्याला तेव्हांपासून सारखें बजावूं लागलें. आणि तें कांहीं खोटें नव्हतें. रतन कांहीं नानूची कोणी नात्यापात्याची नव्हती कीं जातीपातीचीहि नव्हती. पूर्वीं कधींतरी रतनचे वडील कोंकणांत नानूच्या शेजारीं रहात असत तेव्हांची ओळख !

रतन होती म्युनिसिपालिटीच्या मराठी शाळेंत मास्तरीण. अर्थात् ती शाळेंत गेली कीं मग घरांत दुसरें कोणीच नसल्यामुळें नानूचा वेळ जातां जात नसे. खिडकीसमोर खुर्ची टाकून रस्त्यावरील रहदारी पहाण्यांत त्याचे तासाचे-तास जात !

दिवसेंदिवस मुंबईबद्दलच्या त्याच्या कल्पना खोट्या ठरूं लागल्या. कशा खोट्या ठरणार नाहींत ?

प्रत्यक्षावरून अप्रत्यक्षाच्या केलेल्या कल्पना कितीहि उदात्त असल्या तरी त्या खऱ्या ठरतातच असें कुठें आहे? उलट—खऱ्या ठरणें हा अपवाद नि खोट्या ठरणें हा नियम.

पूर्वी नानूला वाटे, मुंबईतले गरीबगुरीब श्रीमंतांच्या औदार्यामुळें जगत असतील! पण अनुभव आला तो मात्र निराळाच! बऱ्याच दिवसांच्या निरीक्षणानें त्याला वाटूं लागलें कीं, मुंबईत गरिबांच्या जिवावरच गरीब जगतो! अगदीं खरा होता त्याचा अनुभव.

मुंबईतले श्रीमंत लोक मोठमोठ्या बंगल्यांत नि ब्लॉकांत राहतात. गोरगरीब कांहीं दाराची घंटा वाजवून भिक्षा मागायला जात नाहींत आणि कोणी जाऊंहि देणार नाहीं. भिकारी भिक्षा मागतात ती सर्वसाधारण—जवळजवळ गरिबांच्याच चाळींतून! मग गरीबच नाहीं का गरिबांचा अन्नदाता?

* * *

बरेच दिवस गेले.

'किती दिवस असा त्रास द्यायचा आपण रनतला? परक्यांच्या चांगुलपणाचा फायदा घ्यायचा म्हटला तरी त्याला कांहीं सीमा आहे कीं नाहीं.?'

नानूचें मन नानूला बोचूं लागलें. खाल्लेलें अन्नहि त्याच्या अंगाला लागेना. 'लाथ मारीन तिथं पाणी पाडीन' ही मुंबईला यायच्या पूर्वीची धमक त्याच्यांत

आतां राहिली नव्हती. स्वतःच्या भवितव्याविषयीं तो दिवसेंदिवस साशंक होऊं लागला.

शिवाय रतनकडे येणाऱ्या तिच्या इतर मैत्रिणी नानू-कडे पाहून आपापसांत कुजबुजत नि फिदीफिदी हंसत. तेंहि नानूला दिवसेंदिवस असह्य होत होतें. रतनला नानूच्या खेडवळ साधेपणाचें—साधेपणा कसला तो—अजागळपणाच—कांहीं वाटत नसे. पण तिच्या शाळेंतल्या इतर मास्तरणी मात्र रतनकडे आल्या म्हणजे नानूची टर उडवायच्या! तो ह्या सर्व चटकचांदण्यांच्या थट्टेचाच विषय होऊन बसला होता. त्या त्याला 'रानमाणूस' म्हणायच्या.

आणि खरें म्हटलें तर त्याला कारण नानूचा विक्षिप्त-पणा! एकादा विषय निघाला कीं नानू असें कांहीं विचित्र बोले कीं, सर्वसाधारण माणसाला तें मुळीं कळतच नसे.

एकदां, सूर्य कां उगवतो नि कां मावळतो याचें कारण सांगतांना नानूच्या कल्पना—भराऱ्या पाहून रतनच्या मैत्रिणी खो खो हंसूं लागल्या. तो म्हणाला—

" प्रत्यक्ष देवालासुद्धां जन्म माणसांनींच दिला. अशा अचाट कर्तृत्वशक्तीचीं—देवाचा बाप होऊन बसलेलीं माणसं किती थोर असतील? अशा माणसांनीं भरलेलं जग किती पवित्र असेल?—अशा विचारांनीं सूर्य प्रथम डोंगरा-आडून जगाकडे डोकावून पाहूं लागला. प्रथम प्रथम त्याला सारं जग सोन्याहून पिवळं दिसलं. तो या जगाला भुलला नि कळ्या फुलवून त्यानं जगावर

पुष्पवृष्टि केली, लोकांनीं त्याला सूर्योदय असं म्हटलं. पण पुढं त्याचा अनुभव खोटा ठरला. सगळं जग त्यानं पालथं घातलं. पण त्याची निराशा झाली. शेवटीं कंटाळून स्वतःच फुलवलेल्या नाजुक नाजुक फुलांचा चोळामोळा करून त्याच रक्तानं भरलेल्या हातांनीं तो पश्चिमेच्या मार्गानं निघून गेला. पश्चिमेला लाली दिसते ती त्याच रक्ताची लोक त्याला सूर्यास्त म्हणतात. ‘आज तरी जग सुधारलं असेल का ?’ अशा आशेनं सूर्य रोज जगांत येतो नि निराश होऊन रोज निघून जातो. ही त्याची अखंड ये जा चालू आहे. पण जग आहे तसंच आहे. बारा तासांपेक्षां जास्त वेळ राहाण्याइतकं जग कांहीं चांगलं नाहीं असं त्याला वाटत असावं ! ”

असली वटवट एकदां का नानूनें सुरू केली कीं मग त्या मास्तरणी त्याची पोटभर थट्टा करायच्या !

आणखी एकदां असेंच झालें.

त्या दिवशीं रतनच्या शाळेंतील मुली राणीचा बाग पहायला जाणार होत्या. रतननें नानूलाहि बरोबर घेतलें. इतर मास्तरणीहि असणार आणि उगीच आपली थट्टामस्करी होणार, हें नानूला माहीत होतें. आणि म्हणूनच त्यानें थोडेसे आढेवेढे घेऊन पाहिले. पण रतनचा आग्रहच पडला नि नानूचा नाइलाज झाला. सगळ्या मुलीमास्तरणी मोर, कोकिळा बघण्यांत गर्क असायच्या, तर नानू मात्र आपल्या विचित्र स्वभावाला अनुसरून कोंबडा नि कावळा

बघण्यांत गुंतलेला असायचा! त्याची विलक्षण तऱ्हा पाहून इतर मास्तरणी एकमेकींशीं कुजबुजत नि नानूकडे पाहून हळूच म्हणत, "या राणीच्या बागेत सगळं कांहीं आहे. रानडुकर, रानमांजर, रानससा—सगळं आहे, पण रानमाणूस मात्र नाहीं. या नानूलाच जर का इथं ठेवून दिला, तर मात्र ही उणीव भरून निघेल."

त्यांच्या दृष्टीनें नानूच्या डोक्याचे स्क्रू ढिले झाले होते. आणि नानूच्या दृष्टीनें त्यांना मुळीं डोकेंच नव्हतें!

त्या मास्तरणी मोर-कोकिळा बघत कौतुक करीत असतांना नानू मनांत म्हणे—

"बायकांना भेजा नसतो म्हणतात, तें कांहीं खोटं नव्हे! मोर आणि कोकिळा! काय या पक्ष्यांचा उपयोग? आणि कां म्हणून ह्या बायका त्या अज्ञानी मुलींप्रमाणंच त्यांचं कौतुक करतात?

"त्यापेक्षां कावळा नि कोंबडा पहातील तर काय मौज होईल! कोंबडा—रोज मोठ्या पहांटेस आरवून झोंपा काढणाऱ्या जगाला साद घाल घालून उठवणारा प्राणी महत्त्वाचा नाहीं का? जगाला जागवणाऱ्या कोंबड्याचं कौतुक न करतां मोरासारख्या कुचकामी पक्ष्याचं कौतुक करणारं जग कृतघ्नच नव्हे का? उपकारकर्त्याला विसरून वरवरच्या भपक्याला भुलणारं जग मूर्ख खरं!

"आणि कावळा?—बिचाऱ्याचा आवाज कर्णकर्कश आहे खरा, पण त्यांत साऱ्या जगाचं सुख सांठवलेलं आहे

पण याची कदर कुणालाच नसावी ना ? कोकिळेचा कंठ असला तरी मनुष्यजातीचं कल्याण असं कितीसं झालं आहे त्यामुळं ? तीच कावळ्याची काव काव ऐका !—अखिल सृष्टींतली संशोधनशक्ति त्या कावकावींत सामावलेली आहे. " कां–कां " किती अर्थपूर्ण ओरड ! आतांपर्यंतचे जगांतले सारे शोध ह्या ' कां ' नेंच लावलेले नाहींत का ? ' हें असं कां नि तें तसं कां ? ' या ' कां ' च्या कटकटीमुळंच निरनिराळे शोध लागले नि मानवी जीवन इतकं सुखी झालं. संशोधकांचा हा आद्यगुरु कावळा बघायचा सोडून, कोकिळा बघत बसणारं जग किती मूर्ख ! "

घरीं परत आल्यावर त्यानें तसें त्या मास्तरणींना बिनदिक्कत बोलूनहि दाखवलें.

परत एकदां त्या सर्वांनीं त्याला " रानमाणूस " म्हटलें ! तो हिरमुसल्यासारखाच झाला. त्याला वाईट वाटलें. पण त्यांना उलट बोलायला त्याला तोंड नव्हतें. कारण तो रतनच्या उपकाराच्या ओझ्याखालीं चिरडून गेला होता.

चिखलांत रुतलेल्या हत्तीला बघून बेडक्या ' टिंवटिंव ' करूं लागल्या, तरी बिचारा हत्ती काय करणार ?

एके दिवशीं—

वैतागाच्या भरांत, नानूनें रतनच्या नकळतच तिच्या घरांतून पोबारा केला. असल्या जगांत राहण्यापेक्षां जंगलांत जाऊन रहाणें बरें, असा त्यानें निर्धार केला होता.

आणि खरोखरच तो जंगलांत गेला.

बोरवलीच्या बाजूच्या आडरानांत, भिल्लांच्या झोंपड्यांचा त्यानें आश्रय घेतला. श्रीमंत मामानें त्याला हांकलून लावला, पण अर्धनग्न अशा कंगाल भिकारी भिल्लांनीं त्याला आपलेपणा दाखवला !

भिल्ल ! स्पष्टच सांगायचें म्हणजे रानमाणसें तीं ! पण अनुभवानें तींच त्याला देवमाणसें वाटलीं !

जगांतल्या देवमाणसांनीं नानूला रानमाणूस ठरवून उपहास केला. पण रानांतल्या रानमाणसांनीं नानूला देवमाणूस ठरवला. कारण तिथें त्यांच्या मदतीनें तो कोंबड्या पाळून राहूं लागला; तरी फावल्या वेळीं तो त्यांना साक्षर करण्याचा प्रयत्न करी, स्वच्छता, टापटीप, काटकसर ह्या त्यांना त्यापूर्वी अपरिचित असलेल्या गोष्टी नानूनेंच शिकवल्या होत्या. नानू भिल्लांची सेवा करी, भिल्ल नानूची सेवा—मोठ्या प्रेमानें सेवा करीत.

जगांतल्या देवमाणसांत राहण्यापेक्षां रानांतल्या रानमाणसांत राहायला नानूला एक प्रकारचा आनंद नि अभिमान वाटूं लागला.

पुढें पुढें तर त्यानें कोंबडीं पाळण्याचा किफायतशीर धंदा मोठ्या प्रमाणांत सुरू केला नि त्याच धंद्यावर त्यानें बराच पैसा मिळविला.

आज त्याच धंद्याला त्यानें ' कोंबडी संवर्धन संस्थे 'चें स्वरूप आणलें असून लांबलांबचे लोक ती आदर्श संस्था पहाण्यासाठीं येत असतात.

रतनहि त्याची जन्माची जोडीदारीण बनून तिथेंच राहूं लागली. दोघेंहि सुखी झालीं.

दिवसें दिवस नानूच्या कर्तबगारीचें लोक कौतुक करूं लागले. त्याची भरभराट होऊं लागली. मामानें आपल्या श्रीमंतीच्या घमेंडीनें त्याला घराबाहेर काढला होता, पण आतां नानू तसल्या छप्पन्न मामांना विकत घेऊं शकेल इतका गबर झाला होता.

म्हणूनच आतां कुठेंहि—कधींहि नानूचें नांव निघालें कीं, त्याचे मामा मोठ्या अभिमानानें सांगतात कीं, " नानू ना ?—अहो माझा भाचा आहे ! " आणखी कांहीं जवळचें नातें लावतां आलें असतें तर तेंहि त्यांनीं लावलें असतें.

पण नानू प्रत्येकाला सांगत असतो कीं, ' जगांतला प्रत्येक श्रीमंत माणूस हा रानमाणूस आहे ! '

# स्त्रियांची चळवळ

विचार करणें हें शहाणपणाचें लक्षण असतें, अति विचार करणें हें मूर्खपणाचें लक्षण असतें, आणि अल्प विचार करणें म्हणजे महामूर्खपणाच ! 'महिला महासभा' ह्या स्त्रियांच्या संस्थेच्या हातून असाच महामूर्खपणा झाला.

'महिला महासभा' ही स्त्रियांनीं स्थापन केलेली व स्त्रियांसाठीं स्त्रियांनींच चालविलेली एकुलती एक संस्था होती. त्या संस्थेतर्फे मोठमोठ्या पुढाऱ्यांचीं नि प्रसिद्ध व्यक्तींचीं खास स्त्रियांसाठीं व्याख्यानें होत असत. तसेंच एकदां सरोजिनी नायडूंचें व्याख्यान ठरलें. विषय होता 'स्त्रियांचें कार्यक्षेत्र !'

सरोजिनी नायडूंचें व्याख्यान ऐकायला येण्याऐवजीं त्या कशा दिसतात हें पाहायलाच संस्थेचे सर्व स्त्री–सभासद

आपापल्या सुनालेकींसह उपस्थित झाल्या होत्या. विषयापेक्षां व्यक्तीचेंच महत्त्व कदाचित् त्यांना मोठें वाटलें असेल ! कुमारिका, सधवा, विधवा अशा तिरंगी महिलांच्या नानारंगी वेषभूषेमुळें सभागृह अगदीं रंगीबेरंगी आणि रंगदार दिसत होतें. आबालवृद्ध महिलांनीं हॉल अगदीं फुलून गेला. आणि त्यांनीं माळलेल्या फुलवेण्यांचा सुवासाचा घमघमाट सुटला.

ठराविक वेळेला सरोजिनीदेवी आल्या. व्याख्यान सुरूं झालें. त्यांनीं आपल्या भाषणांत एक महत्त्वाचा मुद्दा सांगितला, त्या म्हणाल्या—" पुरुषांप्रमाणं सर्व कार्यक्षेत्रांत स्त्रियांनीं आपली कर्तबगारी दाखविली पाहिजे. उद्योगधंद्यांतहि स्त्रियांनीं पडलं पाहिजे."

सरोजिनीदेवीनीं सरासरी तासभर आपलें तोंड वाजवलें नि त्या हारतुरा घेऊन निघून गेल्या. जमलेल्या बायकांनीं मधून मधून टाळ्या वाजवल्या आणि आपापल्या लेकीसुना घेऊन निघून गेल्या ! परंतु अध्यक्षीणबाईंच्या डोक्यांत मात्र त्या व्याख्यानामुळें विचारांच्या लहरी सुरू झाल्या. बाकीच्या स्त्रीसभासदांच्या बाबतींत नेहमींप्रमाणेंच–म्हणजे 'नळी फुंकिली सोनारें, इकडून तिकडून गेलें वारें,' असेंच झालें !

अध्यक्षीणबाई आपल्या विचारांना कृतींत उतरविण्यासाठीं सारख्या तळमळूं लागल्या. कारण 'क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे' हें समर्थांचें बोधवचन त्यांनीं लहानपणीं

अगदीं घोकून घोकून पाठ केलें होतें; आणि त्यांची स्मरण-शक्ति त्यांच्या देहाप्रमाणेंच दांडगी असल्यामुळें त्या तें अद्यापहि विसरल्या नव्हत्या.

त्यांना मुळींच चैन पडेना. लगेच त्यांनीं आपल्या संयुक्त चिटणीसाचें त्रिकूट बोलावलें. आणि त्यांच्याशीं बराच वेळपर्यंत महत्त्वाचें बरेंच खलबत केलें. नाहीं—होय करतां करतां शेवटीं एक दुकान काढायचें ठरलें ! तिन्हीं चिटणीसांनीं आपापली अक्कल चालवून त्या तिहेरी मेंदूतून एक फक्कड नांव शोधून काढलें दुकानासाठीं. " महिला—वस्तु—निकेतन."

झालें. जागा—अगदीं रहदारीच्या रस्त्यावर एका टोलेजंग अशा सुंदर इमारतींत एक जागा घेतली. आणि सरोजिनीदेवींच्या उपदेशाप्रमाणें ' महिला महासभे'च्या नेतृत्वाखालीं त्यांनीं भर रस्त्यावर दुकान मांडलें.

गांवभर गवगवा झाला. सरकशींतलीं जनावरें ( शिकारखाना ) पाहायला लोक जमतात, त्याप्रमाणेंच तें बायकांचें दुकान आणि त्यांत काम करणाऱ्या तीन महिला पहायला झुंडीच्या झुंडी जमूं लागल्या !

ज्याच्या त्याच्या तोंडी एकच विषय—आणि तो म्हणजे ' महिला वस्तु निकेतन ! '

बायकांचें तोंड म्हणजे एक जाहिरातीचें जिवंत साधनच असतें असें म्हणायला हरकत नाहीं. आणि हें तर बोलून चालून बायकांच्या संस्थेचें बायकांनींच उघडलेलें दुकान !

मग काय विचारता त्या दुकानासाठीं त्यांना कोणत्याहि प्रकारची जाहिरात करावी लागली नाहीं. जाहिरातीवांचून जाहिरात होऊं लागली आणि 'महिला-वस्तु निकेतन' मारे दणक्यांत नि झोंकांत चालूं लागलें.

महिला आतां पुरुषांच्या बरोबरीनें धंद्यांत पडल्या हें पाहून अध्यक्षीणबाईचा जीव भांड्यांत पडला! त्यांना हायसें वाटलें—आनंद वाटला! थोरामोठ्यांनीं अगदीं आठवणीनें शुभसंदेश पाठविले. कांहीं पिकल्या पानांचे आशीर्वादहि आले!

पण पुढें मात्र भलतेंच झालें.

बायकांच्या दुकानांत बायका येण्याऐवजीं पुरुषच जास्त येऊं लागले. त्यांत शेंकडेवारी काढली तर मुलें–तरुण व पोक्त–वृद्ध यांचें प्रमाण अनुक्रमें दहास नव्वद असें पडे! आणि बायका गिऱ्हाइकांचें प्रमाण-शेंकडा शून्य!!

तें दुकान उघडल्यापासून बायकांना हव्या असलेल्या वस्तु नवरे लोक आपोआपच घरांत आणून टाकूं लागले. महिनाभर टकली करून नि रात्रंदिवस तगादा लावला असतांहि 'पुढच्या पगाराला आणूं हं' अशी गुळगुळीत थाप मारून वेळ मारणारे नवरे न सांगतांहि हव्या असलेल्या वस्तूबरोबरच नको असलेल्या वस्तूहि आणून आपापल्या राणीसाहेबांची समाधानी करूं लागले; इतकेंच नव्हे, तर आणखी कांहीं आणूं का? असा दिलदार मनाचा सढळ सवालहि करूं लागले. बोलून चालून बाय-

काच त्या ! त्यांचें 'आणा' हें कांहीं कधींच संपायचें नाहीं ! त्यांची यादी रोजच्यारोज मारुतीच्या शेपटासारखी वाढत चालली. 'महिला—वस्तु—निकेतनां'त नवऱ्यांच्या खेपाहि वाढूं लागल्या.

सर्व साधारण पुरुषांच्या येण्याला चक्कर किंवा फेरी म्हणून 'निकेतन' मधील बायका त्यांची आपापसांत टवाळी करीत. आणि देशभक्ताच्या येण्याला 'भेट' म्हणून "महिला—वस्तु—निकेतनला अमक्या अमक्याची भेट" म्हणून वर्तमानपत्रांत जाहीर करीत. वर्तमानपत्राचे संपादक हेसुद्धां पुरुषच असल्यामुळें 'महिला—वस्तु—निकेतन'चा कोणताही मजकूर ठळक ठिकाणीं व ढळढळीत अक्षरांत प्रसिद्ध होत असे. संपादकमहाशयांच्या ह्या उदारपणाला 'स्त्री—दाक्षिण्य' असें म्हणतात.

असें किती दिवस चालणार ? 'बायकांचें दुकान' हा विषय जुना झाला नि त्या ऐवजीं 'बायकांच्या दुकानांत पुरुषांची गर्दी' हा विषय चर्चेचा झाला !

त्या संस्थेच्या तिन्ही चिटणीस महिला-विक्रेत्या म्हणून पाळीपाळीनें काम करीत. त्यांत एक कुमारिका, एक सौभाग्यवति व एक गंगाभागीरथी—अशा तीन तऱ्हेच्या तीन स्त्रिया होत्या. दुकान बायकांचें असलें, तरी आपली बायको एकटी दुकानांत असतांना पुरुष गिऱ्हाइकें येतात, हें कांहीं सौभाग्यवतींच्या नवरोजींना आवडेना. कारण चोरांचीं पावलें चोरालाच कळतात असें म्हणतात; त्याप्रमाणें पुरु-

मग काय विचारता त्या दुकानासाठीं त्यांना कोणत्याहि प्रकारची जाहिरात करावी लागली नाहीं. जाहिरातीवांचून जाहिरात होऊं लागली आणि 'महिला-वस्तु निकेतन' मारे दणक्यांत नि शोकांत चालूं लागलें.

महिला आतां पुरुषांच्या बरोबरीनें धंद्यांत पडल्या हें पाहून अध्यक्षीणबाईचा जीव भांड्यांत पडला! त्यांना हायसें वाटलें—आनंद वाटला! थोरामोठ्यांनीं अगदीं आठवणीनें शुभसंदेश पाठविले. कांहीं पिकल्या पानांचे आशीर्वादहि आले!

पण पुढें मात्र भलतेंच झालें.

बायकांच्या दुकानांत बायका येण्याऐवजीं पुरुषच जास्त येऊं लागले. त्यांत शेंकडेवारी काढली तर मुलें–तरुण व पोक्त–वृद्ध यांचें प्रमाण अनुक्रमें दहास नव्वद असें पडे! आणि बायका गिऱ्हाइकांचें प्रमाण शेंकडा शून्य!!

तें दुकान उघडल्यापासून बायकांना हव्या असलेल्या वस्तु नवरे लोक आपोआपच घरांत आणून टाकूं लागले. महिनाभर टकली करून नि रात्रंदिवस तगादा लावला असतांहि 'पुढच्या पगाराला आणूं हं' अशी गुळगुळीत थाप मारून वेळ मारणारे नवरे न सांगतांहि हव्या असलेल्या वस्तूबरोबरच नको असलेल्या वस्तूहि आणून आपापल्या राणीसाहेबांची समाधानी करूं लागले; इतकेंच नव्हे, तर आणखी कांहीं आणूं का? असा दिलदार मनाचा सढळ सवालहि करूं लागले. बोलून चालून बाय-

काच त्या! त्यांचें ' आणा ' हें कांहीं कधींच संपायचें नाहीं! त्यांची यादी रोजच्यारोज मारुतीच्या शेपटासारखी वाढत चालली. ' महिला—वस्तु—निकेतनां'त नवऱ्यांच्या खेपाहि वाढूं लागल्या.

सर्व साधारण पुरुषांच्या येण्याला चक्कर किंवा फेरी म्हणून ' निकेतन ' मधील बायका त्यांची आपापसांत टवाळी करीत. आणि देशभक्ताच्या येण्याला ' भेट ' म्हणून " महिला—वस्तु—निकेतनला अमक्या अमक्याची भेट " म्हणून वर्तमानपत्रांत जाहीर करीत. वर्तमानपत्राचे संपादक हेसुद्धां पुरुषच असल्यामुळें ' महिला—वस्तु—निकेतन'चा कोणताही मजकूर ठळक ठिकाणीं व ढळढळीत अक्षरांत प्रसिद्ध होत असे. संपादकमहाशयांच्या ह्या उदारपणाला ' स्त्री—दाक्षिण्य ' असें म्हणतात.

असें किती दिवस चालणार ? ' बायकांचें दुकान ' हा विषय जुना झाला नि त्या ऐवजीं ' बायकांच्या दुकानांत पुरुषांची गर्दी ' हा विषय चर्चेचा झाला !

त्या संस्थेच्या तिन्ही चिटणीस महिला-विक्रेत्या म्हणून पाळीपाळीनें काम करीत. त्यांत एक कुमारिका, एक सौभाग्यवति व एक गंगाभागीरथी–अशा तीन तऱ्हेच्या तीन स्त्रिया होत्या. दुकान बायकांचें असलें, तरी आपली बायको एकटी दुकानांत असतांना पुरुष गिऱ्हाइकें येतात, हें कांहीं सौभाग्यवतींच्या नवरोजींना आवडेना. कारण चोरांचीं पावलें चोरालाच कळतात असें म्हणतात; त्याप्रमाणें पुरु-

थांचा स्वभाव पुरुषालाच समजतो. त्यानें शेवटीं आपल्या बायकोला त्या दुकानांतून काढली. इतकेंच नव्हे तर त्यानें तिला राजीनामा द्यायलाहि भाग पाडलें. आतां राहता राहिल्या कु. नि गं. भा.

पाल्हाळ न लावतां थोडक्यांत सांगायचें म्हणजे त्या कु. चेंहि तसेंच झालें. रोज दिवसांतून तीनदां कांहीं ना कांहीं खरेदी करण्याच्या निमित्तानें दुकानाचा उंबरठा झिजविणाऱ्या एका तरुण उल्लू विद्यार्थ्यांबरोबर कु. चें मेतकूट जमलें ! नि ती कुरूप असतांहि तिचें त्याच्याशीं लग्न झालें ! अर्थात् तिनेंहि त्या दुकानाला व संस्थेला कायमचा रामराम ठोकला. वास्तविक तिला कांहीं त्या दुकानाविषयीं आस्था नव्हतीच. लग्न होत नव्हतें–कसा तरी वेळ घालवून कशांत तरी मन गुंतवायचें–म्हणून ती तें काम करीत होती इतकेंच !

हां हां म्हणतां दोन चिटणीस महिला गेल्या. त्यांच्या ऐवजीं दुसऱ्या महिलांची चिटणीस म्हणून निवड झाली. पण त्या दुकानांत काम करायला तयार होईनात. कारण दुर्दैवानें त्याहि सौ. च होत्या. गं. भा. चिटणीस मात्र खंबीर होती. तिनें दुकानाची सर्व जबाबदारी आपल्या अंगावर घेतली, कांहीं झालें तरी आपण दुकान चालवणार असा दृढ निश्चय केला. तिची चिकाटीच तशी होती.

तरुणपणीं वैधव्य आलें असतांहि तिनें पुनर्विवाह करण्याचें साफ नाकारलें होतें कारण एकदां आलेल्या

अनुभवाची पुनरावृत्ति करून घ्यायला ती तयार नव्हती. परंतु दिवसेंदिवस तिला तो दुकानाचा गाडा ओढवेना. एकटीच्यानें दुकानाचा जंजाळ सांभाळणें शक्य होणार नाहीं, असें पाहून तिनें केवळ संस्थेच्या दुकानाला स्थैर्य आणण्यासाठीं म्हणून पुनर्विवाह करण्याचें ठरवलें. आपण दुकान सांभाळूं, नवरा घर सांभाळील, असा तिचा तर्क होता.

'वर पाहिजे' म्हणून तिनें एक जाहिरात दिली. मिळवती बायको कुणाला नको असते? अर्जांचीं पुडकीं येऊन पडलीं! शेंकडों फोटो आले!! कांदे बटाटे निवडून घेतात तसे तिने ते फोटो निवडले नि एक वर पसंत केला. तिचें लग्न झालें. ध्येयनिष्ठेसाठीं तिनें लग्नाची बेडी अडकवून घेतली, म्हणून स्त्रीसभासदांनीं तिची वाहवा केली. तिलाही मूठभर मांस चढलें! दुकानाच्या भरभराटीचीं कल्पनाचित्रें तिच्या डोळ्यांसमोर नाचूं लागलीं. पण ती सौ. झाली होती हें ती अजिबात विसरली होती. पुरुष नव्हे–नवरे इथून तिथून सगळे सारखेच! मग हा नवा नवरा तरी कसा अपवाद असेल? त्यानेंहि तिला काम करण्याची बंदी केली. गिऱ्हाइकें सगळीं पुरुषच. तिचा नाइलाज झाला नि तिनेंहि राजीनामा दिला. सगळें उलटें झालें. आतां ती घर सांभाळूं लागली नि तें दुकान शेवटीं स्वतःच खरेदी करून तो दुकान सांभाळूं लागला.

स्त्री-विक्रेत्यांची वजाबाकी होत होत शेवटीं त्या वजाबाकीचें उत्तर आलें—'पुरुष'!

पूर्वी तीन बायका काम करीत असत–आतां एक पुरुष काम करूं लागला. गणिताच्या भाषेंत सांगायचें म्हणजे तीन बायका=एक पुरुष असें समीकरण झालें.

परत गांवांत गलबला झाला, ' बायकांचं दुकान पुरुष चालवतो.' पण आश्चर्य हें कीं, तेव्हांपासूनच त्या दुकानांत बायकांची गर्दी होऊं लागली. स्त्रिया दुकानांत काम करीत, तेव्हां पुरुष गिऱ्हाइकें येत. पण आंतां पुरुष दुकान चालवूं लागल्याबरोबर स्त्री गिऱ्हाइकें मुंग्याप्रमाणें जमूं लागलीं. खरें सांगायचें तर आतांच तें खरें बायकांचें दुकान झालें होतें. स्त्रिया तें दुकान चालवीत तेव्हां लोक त्याला ' पुरुषांचं दुकान ' असें म्हणत ! आतां पुरुष तें दुकान चालवूं लागला तेव्हां त्याला ' बायकांचं दुकान ' असें म्हणतात !!

# देवळांत चमत्कार !

अनेकांच्या अनेक आवडी असतात, पण विचार करीत बसणें ही अरुणची तऱ्हेवाईक आवड होती. अविनाशला ठाऊक नव्हतें असें नव्हे. पण अरुणच्या मुद्रेवरील त्या-वेळची खिन्नता मात्र त्यापूर्वी त्याला कधींच दिसली नव्हती.

अरुणची त्यावेळची चर्या पाहून अविनाशला आश्चर्यच वाटलें. आल्या पावलांनींच परत जावें, बसूं दे त्याला तसाच विचार करीत, असेंहि त्याचें एक मन म्हणूं लागलें. पण दुसरें मन म्हणालें,—काय भानगड आहे कोण जाणे ! उलगडा घ्यावाच करून, कांहीं बरं वाईट असलं तरी.

" अरुण, असा उदास कां दिसतोस तूं आज ? काय झालं ? " खुर्ची घेऊन अरुणच्या जवळ बसतां बसतां अविनाशनें विचारलें.

" जगाचा कंटाळाच आलाय मला." कपाळाला आंठ्या घालून अरुणनें उत्तर दिलें. अविनाश मोठमोठ्यानें हंसत सुटला. त्यानें ओळखलें कीं, स्वारी आपल्या नेहमीच्या सवईप्रमाणेंच वैतागलेली होती. आगींत तेल ओतण्यासाठीं म्हणूनच अविनाश अरुणला म्हणाला,—

" अस्सं, अस्सं ! कांहीं माणसं निष्कारण विचार करण्यांत आपलं अर्धं आयुष्य फुकट घालवतात; त्यापैकीं तूं एक फुकट फौजदार आहेस झालं ! "

" खरं आहे तुझं म्हणणं, " अरुण उद्गारला. " तुला नाहीं कळायचं तें ! "

" काय नाहीं कळायचं मला अरुण ? "

" माझी तळमळ ! "

परत अविनाश हंसला. आणि हंसत हंसतच म्हणाला, " आहे ठाऊक मला तुझी तळमळ. आपल्या म्हणण्या-प्रमाणं जगांतले सर्व व्यवहार घडले पाहिजेत, असं तुझ्या-प्रमाणं प्रत्येक जण म्हणूं लागला, तर मोठा अनर्थंच ओढवेल ! "

अविनाश बोलत होता, तरी अरुण आपल्या विचार-तंद्रींतच गर्क होता, कॅलेंडरवरची तारीखसुद्धां त्यानें बदलली नव्हती. तें काम अविनाशनें केलें. बराच वेळपर्यंत अरुण कांहींच बोलेना, म्हणून मुद्दाम त्याला डिवचण्यासाठीं म्हणून अविनाश म्हणाला, " जग हें असें आहे, म्हणूनच जगण्यांत मौज आहे. "

" मूर्ख आहेस तूं! असल्या जगांत जगायला तुला मौज वाटते, पण मला शरम वाटते. यापेक्षां अधिक चांगल्या जगांत आपण जगावं—"

" म्हणजे ? हें जग चांगलं नाहीं, असं तुला म्हणायचं आहे कीं काय ?" अरुणचें बोलणें पुरें होण्यापूर्वीच अविनाशनें प्रश्न केला.

" अर्थात्!" अरुणनें उत्तर दिलें. " अविनाश, कधीं काळीं सुधारेल का रे हें जग ?"

" कां नाहीं सुधारणार ? कालच्यापेक्षां आज सुधारलं, आजच्यापेक्षां उद्यां सुधारेल! पण तें तसं कधींच पूर्ण सुधरूं नये, असं मला वाटतं."

" कां ?"

" अपूर्णांतच आनंद वाटतो मला!"

" वाः हल्लीं हल्लीं एखाद्या कवीसारखा बोलायला लागलास तूं," अरुण हंसतच म्हणाला.

" काय वाटेल तें म्हण तूं! मी कांहीं तुझ्यासारखा तत्त्वज्ञानी नाहीं.—मी आपला सर्वसाधारण–अगदीं व्यवहारी माणूस आहें. स्पष्ट बोलूं लागलेल्या मुलाच्या बोलण्यापेक्षां मला आपले बाळाचे बोबडे बोलच अधिक आवडतात. पौर्णिमेच्या पूर्ण-चंद्रापेक्षां चवथीची चंद्रकोरच जन्मभर पहात बसावं, असं मला वाटतं. पूर्णपणं फुललेल्या फुलापेक्षां पाकळ्या नुकत्याच मोकळ्या होत आहेत, अशा अस्फुट हंसऱ्या कळ्याच मला आवडतात."

" मला नाहीं तसं वाटत. " अरुण उद्गारला.

" हाच तर तुझ्या माझ्यांत फरक आहे! जगाला मूर्खांत काढून तूं जगाला शिकवूं पाहतोस, तर मी जग शहाणं समजून जगाकडून शिकण्याचा प्रयत्न करतों. तूं शिक्षकाच्या भूमिकेवर आहेस, मी शिष्याच्या जागेवर आहें. आहे त्यांत समाधान मानतां येत नाहीं त्याला आणखी कितीहि मिळालं तरीही समाधान वाटणार नाहीं. तुझ्या· सारख्या चिंतातूर जंतूला कुठल्याहि जगांत सुख मिळ-णार नाहीं.

" कां नाहीं मिळणार ? " अरुणच्या ह्या प्रश्नांत, 'आपलं कुठं चुकत तर नसेल ना ?' अशी साशंक वृत्ति स्पष्ट दिसत होती. अविनाशच्या मताप्रमाणें अरुण चुकत होता. त्याचीं जगाबद्दलचीं मतें कलुषित दृष्टीमुळें बनलीं होतीं, असें अविनाशचें ठाम मत होतें. आणि अरुणची कानउघडणी करण्याची संधी आपल्याला कधीं मिळेल याची तो वाट पहात होता. आज ती वेळ आली, म्हणून अविनाशला झालेला अपूर्व आनंद त्याच्या चेहऱ्यावर दिसण्या-सारखा होता.

" याचं कारण असं आहे अरुण, " अविनाश बोलूं लागला. " स्वतःला सुखी करणं ही एक कला आहे ती तुला अद्याप साध्य झालेली नाहीं.

" कुठली बुवा ही अजब कला ? " जवळ जवळ थट्टा करण्याच्या इराद्यानें अरुणनें विचारलें.

" तेंच सांगतों आहें मी. माझ्याकडे पहा—एखाद्या वर्गांतल्या विद्यार्थ्यासारखा वागतों मी. जग—समाज हा माझा वर्ग, मी त्यांतला एक विद्यार्थी ! वर्ग हंसला कीं मी हंसतों, वर्गाला दुःख झालं कीं मलाहि दुःख होतं. समूहाशीं सहजीव होण्यांतच माणूस सुखी होतो. अरुण, म्हणूनच मला हें जग आवडतें ! इतकंच नव्हे तर, याच जगांत जन्मोजन्मीं जन्माला यावं, असं मला वाटतं."

" हं—वेडा आहेस अविनाश तूं ! जगाची तुला अजून पारख झालेली नाहीं."

" कां नाहीं ? जगांत अनेक दोष आहेत. मला ठाऊक आहे. आणि तरीही माझं हें मत आहे."

" अंहं ! तुला नाहीं कळलं माझं म्हणणं. समाजसागरावर उघड उघड तरंगणारीं लढाऊ जहाजं तूं पाहिलीं असशील, पण त्याच समाजसागराच्या पोटांत किती भयंकर स्वरूपाच्या पाणबुड्या बोटी संचार करतात, याची तुला अजून कल्पना नाहीं."

" हें पहा, असा मोघम बोलूं नकोस. कसल्या पाणबुड्या बोटी तुला दिसल्या ?" अविनाशनें प्रश्न केला.

अरुण संतापानें लालेलाल झाला. देवळांतला चमत्कार त्याला आठवला. आणि फडक्यांच्या शिवमंदिरांत नित्य नेमानें देवदर्शनास जाणाऱ्या अविनाशची हजेरी घेण्याच्या उद्देशानें अरुणनें शेवटीं ती गोष्ट सांगितलीच.

* * *

फडक्यांचें शिवमंदिर म्हणजे त्या गावांतलें सर्वांत मोठें नि लोकप्रिय देऊळ! संध्याकाळच्या वेळेला बायकांनीं आणि मुलांबाळांनीं अर्धेअधिक देऊळ भरून जाई. गावांतल्या पेन्शनर लोकांचा तर तिथें अड्डाच असायचा! स्त्रिया त्या देवळांत जमतात एवढें सांगितल्यावर पुरुषांच्याहि देवभक्तीला ऊत येत असे, हें निराळें सांगायलाच नको. स्त्रियांमुळेंच देवळांत गर्दी जमते. स्त्रिया देवळांत जायच्या बंद होतील तर देवांच्या मूर्तींखेरीज चिटपांखरूंहि तिथें दिसणार नाहीं! फडक्यांच्या शिवमंदिराच्या लोकप्रियतेचेंहि खरें इंगित तेंच होतें. शिवाय तें मंदिर चमत्काराविषयीं फार प्रसिद्ध होतें. त्या देवळांत कधीं कधीं आकाशवाणीचे आवाज येतात, अशी लोकांची समजूत होती. आपण प्रत्यक्ष तो आवाज ऐकला आहे, असें शपथेवर सांगणारेहि भाविक कांहीं थोडे थोडके नव्हते. अविनाश हा अशा भाविकांपैकींच एक होता. तोहि जायचा रोज शिवदर्शनाला. देवाधर्मावर त्याचा तसा फारसा विश्वास होता असें नव्हे; पण विश्वास नसतांनासुद्धां माणूस ज्या अनेक गोष्टी करतो, त्यांपैकींच अविनाशचें हें देवदर्शन होतें. नियतकालिकांतून प्रसिद्ध होणाऱ्या भविष्यांवर कुठें आपला विश्वास असतो? पण तरीसुद्धां आपण तें शोधून वाचतोंच कीं नाहीं? तसेंच तें देवदर्शन!

शिवमंदिरांत आकाशवाणी होते ह्या गोष्टीवर अविनाशचा विश्वास होता. मंदिरांत शिवपार्वतीचा विलास चालतो

हें त्याला खरें वाटे. पण अरुणला हें पटत नसे. अविनाशच्या दृष्टीनें अरुण नास्तिक होता. आणि अरुणच्या दृष्टीनें अविनाश अंधश्रद्धाळू होता.

अरुण मात्र नुसता अविश्वास दाखवून स्वस्थ बसला नाहीं. देवळांत खरोखरच हा चमत्कार घडतो कीं काय हें पहाण्याचा त्यानें निश्चय केला.

शंकराचें देऊळ म्हटलें कीं, तें कुठेंतरी एका बाजूला असायचें आणि देवळाच्या गाभाऱ्यांत गुप्याट काळोख असायचा, हें जवळ जवळ ठरल्यासारखेंच असतें! फडक्यांचें शिवमंदिरसुद्धां कांहीं ह्या गोष्टीला अपवाद नव्हतें. देऊळ तसें मोठें होतें. पण प्रत्यक्ष शिवपिंडी असलेला गाभारा अत्यंत लहान होता. एका अंधाऱ्या घुमटींत समईच्या सौम्य प्रकाशांत फुलांनीं झांकून ठेवलेली शिवाची पिंडी लांबून अस्पष्ट दिसे. घुमटीचा दरवाजा ठराविक वेळेपुरताच उघडा असे. आणि जेव्हां उघडा राही, त्यावेळीं भिकंभट पुजारी एका फाटक्या व्याघ्रचर्मावर बसून द्वाररक्षण करी. गाभाऱ्यांत उतरायला चार पांच पायऱ्या होत्या, पण आंत जायला सर्वांनाच बंदी होती. मंदिराचे मालक खुद्द रावबहादुर फडके—तेसुद्धां आंत जात नसत, मग इतरांची काय कथा!

एके दिवशीं—

मंदिराच्या मुख्य दरवाजास टाळें मारण्याच्या पूर्वी अरुण देवळांत दबा धरून बसला. ठराविक वेळेला भिकं-

झटानें घुमटीचा जाळीदार दरवाजा नुसता ओढून घेतला, मुख्य दरवाज्यास कुलूप ठोकलें आणि नित्याप्रमाणें तो निघून गेला.

रात्रीं अकराचा सुमार झाला, तरी कांहीं कसलाच आवाज अरुणच्या कानांत पडला नाहीं. काळोख मी म्हणत होता. जिकडे तिकडे शांत नि निस्तब्ध वातावरण होतें. नुसता आंवढा घोटला असता, तरीसुद्धां एखाद्या खोल विहीरींत भला थोरला धोंडा टाकल्यासारखा डुब्ब् असा आवाज झाला असता.

इतक्यांत—

घुमटींत कसला तरी आवाज घुमूं लागला. ध्वनि निघतो न निघतो तोंच प्रतिध्वनि निघे नि त्या शब्द प्रतिशब्दांच्या संमिश्र आवाजानें घुमटी घुमूं लागे.

" होते बरं का आकाशवाणी ! " अरुणचें मन त्याला बजावूं लागलें. पण पुन्हा कसलाच आवाज येईना. अर्थात् अरुणचे तर्ककुतर्क सुरु झाले. " आवाज आल्यासारखा आपल्याला भास तर झाला नसेल ना ? " त्याला शंका आली. तितक्यांत पुन्हा आवाज आला.

" इश्श ! केवढ्या मोठ्यानं बोलतोस ?...भिंतीलासुद्धां कान असतात बरं !..."

एवढेच चुकते चुकते शब्द अरुणच्या कानांत पडले. त्याचें मन अधिक साशंक नि उतावीळ झालें. हळुहळू कसला तरी आवाज निघे, पण तो कसला होता हें स्पष्ट

कळत नसे. " भिंतीलासुद्धां कान असतात, " हे शब्द कुणा तरी स्त्रीचे होते, हें भिंतीला कान लावून बसलेल्या अरुणच्या लक्षांत यायला वेळ लागला नाहीं.

" देवळांत कांहीं भानगड तर चालत नसेल ना ? " तो मनाला विचारूं लागला.

" छे छे ! तसं कसं असेल ? किती ओंगळ विचार सुचला तुला ! " त्याचें मन त्याला दोष देऊं लागलें.

पण पुढें ?—सगळेंच चमत्कारिक ! सांगितलें तर कुणाला खरेंसुद्धां वाटणार नाहीं, असला इरसाल प्रकार ! कारण कुणातरी वल्लभरमणीच्या एकांतांतल्या गुलगुल गोष्टी गाभाऱ्यांत चालल्या होत्या. प्रेमाच्या बेहोष स्थितींत जगालाच नव्हे तर स्वत:लाहि क्षणभर विसरून गेलेल्या मदनरतीच्या प्रणयचेष्टांचा तो आवाज होता. पालीच्या चुकचुकण्यासारखा चुकचुकाट स्पष्ट ऐकूं येत होता.

स्वयंपाक घरांतून ऐकूं येणाऱ्या कपबश्यांच्या खिल-खिलाटावरून आंत चहाची तयारी चालली असावी, हें जसें आपण कोणाहि ज्योतिष्याच्या मदतीवांचून ओळखतों, तसेंच घुमटींतून ऐकूं येणाऱ्या बांगड्यांच्या नाजुक निनादा-वरून अरुणनें ताडलें कीं, गाभाऱ्यांत कुणी तरी नाजुक साळुंकी आपल्या लाडक्या चंडोलाच्या बाहुपाशांत बसून प्रणयसंगीताची सुरेल शीळ घालीत असावी !

खुदुखुदु हंसणाऱ्या गोड पण अस्पष्ट नादलहरी, मधुन-मधून पुरुषी आवाजाची पण प्रेमसुलभ लाडिक बोली,

क्वचित ऐकूं येणारा " अं ऽ ऽ ऊं ऽऽऽ " असा कांहींसा कण्हल्यासारखा नि कांहींसा कुंथल्यासारखा अपरिचित आवाज, नितांत सुखाच्या समाधानानें हायसें वाटून सोड-लेले सुस्कारे, इत्यादि इत्यादि वरून अरुणाला सर्व कांहीं कळून चुकलें. प्रेमाच्या मानस सरोवरांत चोंचींत चोंच घालून मनमुराद पोहणाऱ्या राजहंसाच्या प्रणयी-युगुलाचें चित्तवेधक चित्र अरुणनें स्वतःच्या कल्पनासृष्टीत रंगवलें.

त्या कल्पनाचित्राकडे पाहून तोसुद्धां स्वतःला विसरून गेला. पण क्षणभरच !

पायांच्या शिरा तट्तट् वाजल्याचा आवाज त्याच्या कानांत पडला.

आंतला शिवपार्वतीचा जोडा विलास संपवून आतां बाहेर येत होता हें त्यानें ओळखलें, नि तो चोरपावलांनीं बाजूच्याच खांबाआड लपला.

" कर्र ऽऽऽ ! "

घुमटींतून दोन माणसें बाहेर पडतांना, दरवाज्याचीं बिचारीं बिजागरें किंचाळलीं !

दरवाजा कर्र होतांच तीं माणसें पाहून अरुणच्या काळजांत चर्र झालें ! तीं दोघेंहि अरुणच्या पूर्ण माहि-तीचीं होतीं.

ती—ती शिवमंदिराचे मालक रावबहादूर अप्पाराव फडके यांची जी. ए. पास झालेली एकुलती एक कन्या !

आणि तो !

तो—त्यांच्या टांग्याचा घोडा धुणारा पोऱ्या म्हादू !

शिवमंदिरांतली आकाशवाणी अरुणच्या लक्षांत आली. तीं दोघेंहि ज्या दरवाज्यानें बाहेर पडलीं, त्याच दरवाज्यानें तोहि बाहेर पडून घरीं गेला.

त्या दिवसापासून त्यानें भिकंभटाच्या कारस्थानावर पाळत ठेवली. लौकरच त्याला आढळलें कीं, फडक्यांच्या मुलीनेंच भिकंभटाची मूठ झांकली होती असें नव्हे, तर तशा अनेक तरुणतरुणींकडून चिरिमिरी घेऊन गाभाऱ्यांतली जागा गुपचूपपणें भाड्यानें देण्याचा त्याचा पोटधंदाच होता.

शिवमंदिरांतल्या आकाशवाणींतली ही 'अंदरकी बात' अरुणनें अविनाशला सांगितली आणि त्यानें त्याला खडसून विचारलें,—

"सांग, अविनाश, हाच ना तुझा समाज ? हेंच ना तुझं जग ? याच समाजांत—याच जगांत एकजीव होण्यांत तुला आनंद वाटतो ना ?"

अविनाश स्तब्ध होता. तो निरुत्तर झाला.

"अशा जगांत जगण्यापेक्षां आत्महत्त्या करावी, असं मला वाटतं. पण तेवढा धीर होत नाहीं म्हणून हें भ्याड जीणं जगावं लागतं. अविनाश, या गोष्टी—हें सत्यसुद्धां बोलायला चोरी ! सत्य सिद्ध करायलासुद्धां तुझ्या जगांत पुराव्याचं पाठबळ हवं असतं बरं !" अरुणाच्या अंगाची नुसती लाहीलाही होत होती.

अविनाशचें लक्ष कॅलेंडरवरच्या तारखेच्या कपट्यावर

खिळलें होतें. तारखेच्याखालीं लॉंगफेलोचें एक वचन होतें. तें वाचून त्यानें क्षणभर विचार केला आणि त्या वचनाकडे बोट दाखवून तो अरुणला म्हणाला,

"अरुण बघ हें काय म्हणतो हा."

अरुणनें तें वचन वाचलें.

Nothing useless is or low,
Each thing in its place is best.

"अगदीं बरोबर आहे त्याचं म्हणणं," अरुण म्हणाला.

"कसं ?" अविनाशनें प्रश्न केला.

"पहिल्या ओळींत तुझं मत आहे; दुसऱ्या ओळींत माझं मत आहे. अविनाश देवळांचा उपयोग देऊळ म्हणून झाला तर त्यांत तितकंसं वावगं नाहीं. पण देवळांतून जर कुंटिणखाने चालूं लागले, तर तें तुला आवडेल का ? हाच का देवळांचा उपयोग ? अविनाश, हिंदुस्थानांतलीं सगळीं देवळं जमीनदोस्त करून त्यांतली मालमत्ता जर गरिबांना वांटून टाकली तर गरिबी हा शब्दसुद्धां हिंदुस्थानांत ऐकायला मिळणार नाहीं. औषधालासुद्धां गरीब उरणार नाहीं."

हें बोलत असतांना त्याच्या अंगांत कसला तरी संचार झाल्यासारखा भास होत होता. डोळे लालबूंद करून नि दांत ओठ चावून तो अगदीं आवेशानें बोलत होता. त्या विषयावर त्याला कोणी बोलायला सांगितलें असतें एकाद्या सभेंत, तर मला वाटतें त्यानें कमीत कमी तीन तास तरी चांगलें लेक्चर झोडलें असतें !

देव आणि देऊळ ह्या दोन नावडत्या गोष्टी होत्या त्याच्या. बुवाबाजीनें हिंदुंचें कितीसें नुकसान झालें आहे हें त्याला बरोबर सांगतां आलें नसतें कदाचित्; पण देवबाजी नि देऊळबाजी ह्यामुळें माणसाचें किती नुकसान झालें आहे, याची अगदीं गंमतवार माहिती तो सांगूं लागला कीं मग त्याला तहानभुकेचाहि विसर पडे.

प्रत्येक दिवशीं पै-पैसा याप्रमाणें परार्धावधी रुपये निर-निराळ्या रुपानें हिंदुस्थानांतील देवळांत जमा होत आहेत. अशा रीतीनें सार्वजनिक मालकीची मालमत्ता कोणातरी एका मालकाच्या ताब्यांत जात असलेली पाहून त्याला देवळांत जाणाऱ्यांची मनस्वी चीड यायची.

देवळांत जमा होत असलेली व दिवसेंदिवस वाढत असलेली गडगंज संपत्ति ही सारी समाजाच्या मालकीची आहे, नि वेळीं प्रसंगीं त्या संपत्तीचा उपयोग समाजालाच झाला पाहिजे, असें त्याचें कुणालाहि न पटण्यासारखें मत होतें. नेहमींच तो देवळांना 'सार्वजनिक बँका' अशी संज्ञा देई. आणि त्या बँकांचा उपयोग कसा करावा हें समाजाला कळत नाहीं असें समजून बहुजन समाजाला मूर्खांत काढी.

पण आतां मात्र अरुणलाहि तसेंच वाटूं लागलें. अवि-नाशचीं मतें अगदींच कांहीं चुकीचीं नाहींत हें त्याला थोडेंसें पटलें. तरीहि त्या विषयावर अविनाश-अरुणची बरीच प्रश्नोतरी झाली.

बराच वेळपर्यंत त्यांचा हा झगडा चालला. तो दिवस

गेला. आणखी अनेक दिवस गेले. गेलेले दिवस नि दाबलेल्या वासना दडत नाहींत असें म्हणतात, तसें हें देवळांतलें प्रकरणसुद्धां कांहीं फार दिवस दडून राहिलें नाहीं.

देवळांतल्या चमत्काराचें मूळ कांहींना कळलें, कांहींना कळलें नाहीं. मात्र रा. ब. फडक्यांच्या कानांवर ती गोष्ट गेल्याशिवाय राहिली नाहीं. देऊळ बांधल्याबद्दल त्यांना पश्चात्ताप झाला. आणि—

एके दिवशीं न घडलेली गोष्ट घडली !

रा. ब. फडके यांनीं ' शिवमंदिर ' ही पाटी काढून त्या ऐवजीं ' फडके यांची धर्मशाळा ' अशी पाटी लावल्याची बातमी वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झाली.

ह्या प्रकारामुळें धर्मभोळ्यांनीं फडक्यांना लाखोली वाहिली. पण अरुणनें त्यांना पुष्पहार वाहिला नि त्यांचें अभिनंदन केलें.

गोरगरिबांना निवाऱ्याची जागा मिळाली !

भिकंभटावर पुन्हा भीक मागण्याची पाळी आली !

देवळांतल्या चमत्कारामुळेंच हा चमत्कार घडून आला, हें मात्र पुष्कळांना अद्याप ठाऊक नाहीं.

# बापाचं नांव

नाहीं होय करतां करतां मालतीनें एकदांचा हुंकार दिला नि ती आणि प्रीतम सिनेमासाठीं म्हणून निघालीं. सिनेमाच्या नांवावरून तो बोलपट अत्यंत गंभीर असेल असें प्रीतमला वाटलें होतें. पण खरा प्रकार फार निराळा होता.

बोलपटाचें नांव " बॅचलर मदर " असें होतें. थिएटरवर जातात तर प्रेक्षकांची हीऽ-ऽ गर्दी ! तिकिटासाठीं लोक नंबर लावून एकामागें एक उभे असल्यामुळें थिएटरभोंवतीं जणुं काय माणसांच्या माळाच लावून तें सुशोभित करण्यांत आलें होतें, असें लांबून पहाणाऱ्याला एकदम भास झाला असता.

पोलीसांचाहि बंदोबस्त होता. फुलून गेलें होतें सारें थिएटर गर्दीनें ! पण एवढी गर्दी होती ना ? तरी गलबला

मात्र मुळींच नव्हता ! वास्तविक 'धूर तिथें आग' ह्या कार्यकारण भावानें पाहिलें तर 'गर्दी तिथं गलबला' किंवा 'गलबला तिथं गर्दी' असा ठोकताळा बांधायला कांहींच हरकत नाहीं. पण इंग्लीश थिएटरें (जिथें इंग्रजी बोलपट दाखविलीं जातात तीं थिएटरें) मात्र ह्या नियमाला अपवाद म्हणून दाखवितां येतील ! जे लोक इतर थिएटरांत मारे गोंगाट करून थिएटरच्च डोक्यावर घेतात, तेसुद्धां तिथें कसे अगदीं साव्यासुब्यासारखे शिस्तीनें उभे राहून तिकिटें काढतात ! याचें नांव स्थानमहात्म्य !

प्रीतम आणि मालती यांनीं शेवटीं एकदोनचीं दोन तिकिटं काढलीं नि आंत जाऊन बसलीं. पांचदहा मिनिटांतच सिनेमाला सुरवात झाली.

भाताची परीक्षा शितावरून म्हणतात, तसें प्रीतम नि मालती यांनीं पहिल्या रीलवरूनच सबंध बोलपटांतील कथानकाचा अंदाज बांधला. सिनेमा संपल्यावर त्यांचा अंदाजच खरा ठरला. कारण तो बोलपट शंभर टक्के विनोदी होता. हंसतां हंसतां मुरकुंड्या वळल्या प्रेक्षकांच्या ! दोन तास कधीं निघून गेले हें कळलेंसुद्धां नाहीं त्या दोघांना ! बोलपट सुंदर होता खरा, पण त्या दोघांची— दोघांची म्हणण्यापेक्षां प्रीतमचीच जास्त निराशा झाली. मालती आधीं त्या दिवशीं तो बोलपट पहायला जायला तयारच नव्हती. प्रीतमचा आग्रहच पडला म्हणून ती गेली होती. अर्थात् ती तो बोलपट पाहून खरोखरच खूष झाली !

पण प्रीतम जरा नाराज दिसला. त्याचें नाहीं समाधान झालें. त्याला बोलपट आवडला यांत शंका नाहीं; परंतु त्याला जें पाहिजे होतें किंवा त्या बोलपटांत जें असेल असें त्याला वाटलें होतें, तें त्याला न दिसल्यामुळेंच, त्याची थोडीशी निराशा झाली होती.

" बॅचलर मदर " हें नांव वाचून त्याला वाटलें होतें कीं, बहुतेक त्या बोलपटांत " लग्नपूर्व मातृत्व " हा महत्त्वाचा तितकाच वादग्रस्त विषय चर्चेला घेतलेला असेल! पण त्याची ती अटकळ चुकीची ठरली!

कोणत्याहि सामाजिक विषयांत प्रीतम मोठ्या उत्साहानें घेतां येईल तो भाग घेई. सामाजिक प्रश्नांची चर्चा करण्यांत त्याला एक प्रकारचा आनंद वाटे. आणि म्हणून "लग्नपूर्व मातृत्व " ह्या विषयासारख्या गहन विषयांवरील बोलपट आपण मालतीलाहि दाखवावा म्हणूनच त्यानें तिला मोठ्या आग्रहानें नेली होती. पण झालें भलतेंच! प्रख्यात वक्त्याचें गंभीर विषयावरील व्याख्यान ऐकायला म्हणून जावें नि लावण्याच ऐकून परत यावें, असें प्रीतमला वाटलें.

पण तेवढ्यानें कांहीं त्यांच्या चर्चेला मुळींच बाधा झाली नाहीं. उलट त्या विषयासंबंधानें नवे नवे विचार सुचून त्यांचा वादविवाद मोठा रंगांत आला!

" लग्नपूर्व मातृत्व " असावें कीं नसावें ह्या संबंधानें बोलतां बोलतां, हरिदासाच्या कथेंतील आडकथेप्रमाणें इतर अनेक विषय ओघाओघानेंच त्यांच्या संभाषणांत येऊन

जात ! शेवटीं मूळ विषय बाजूलाच राहिला, आणि 'मातृत्व स्वयंसिद्ध आहे नि पितृत्व तर्कसिद्ध आहे,' ह्या शुष्क सिद्धांतापर्यंत तीं आलीं.

ह्या सिद्धांताची प्रीतम नेहमींच तरफदारी करीत असे. पण मालती मात्र हा विषय आला कीं आपलें मत द्यायची टाळाटाळच करी ! आवडत नव्हता तो सिद्धांत तिला मनापासून. मालती म्हणे,—

" तत्त्व म्हणून एकवेळ मी तो सिद्धांत खरा मानीन. परंतु व्यावहारिक दृष्ट्या त्याला माझा जोराचा विरोध आहे. "

ह्या तिच्या विरोधाला तिचीं जीं अनेक कारणें होतीं, त्यांत असेंहि एक कारण होतें कीं, ' असल्या सिद्धांतामुळं मुलाला अगर मुलीला आपल्या आईच्या शीलाविषयीं नि चारित्र्याविषयीं घाणेरडा संशय घेण्याची पाळी येते. '

ह्याच विषयावरील दोघांच्या मतभेदांमुळें अनेकदां खडा-जंगी उडून एकमेकांबरोबर अबोलाहि धरण्याचे प्रसंग बरेच येऊन गेले होते. पण अबोलेपणाचें ओढूनताणून आणलेलें चंद्रबळ कसें टिकेल ? कोणी ना कोणी बोलायला सुरवात करायची नि परत पूर्ववत् गट्टी जमायची !

आजहि तसंच होणार हें प्रीतमनें ताडलें. तूं मी होणार, तोंडास तोंड लागणार, नि परत मौन पाळण्याची पाळी येणार, असें प्रीतमचें मन त्याला बजावूं लागलें. कारण बोलतां बोलतां रमेश पेटकरचा मालतीनें उल्लेख केला.

भाई रमेश पेटकर, हा प्रीतमचा अत्यंत आवडता लेखक! समाजशास्त्रावरील त्याच्या निबंधांची तो नेहमींच तारीफ करी! आणि मालती मात्र त्याला—म्हणजे रमेशला सडकून शिव्या देई!

पहिल्या पहिल्यानें प्रीतमला वाटलें कीं, रमेश आपल्या बापाचं नांव लावीत नाहीं, म्हणून कदाचित् मालतीच्या मनांतून तो उतरला असेल! पण खरें कारण जरा निराळें-च होतें, हें आज त्याला कळून चुकलें. रमेशच्या पोकळ तत्त्वज्ञानामागचा सारा इतिहास मालतीनें प्रीतमला सांगितला नसता, तर आणखी किती दिवस तो त्याला तसाच डोकीवर घेऊन नाचला असता कोण जाणे!

रमेश आपल्या बापाचें नांव चुकूनसुद्धां लावीत नसे. आणि कोणी लावलेंच तर त्याच्या तळपायाची तिडीक मस्तकांत जाई! "कां हो तुम्ही आपल्या बापाचं नांव लावीत नाहीं?" असें कोणी त्याला विचारलेंच, तर तो विचारणाऱ्यालाच उलट विचारी कीं, "कसं लावायचं मी बापाचं नांव? आमची आई कोण हें आम्हीं सांगू शकूं पण बाप कोण हें कसं सांगावं बुवा? मातृत्व हें जसं स्वयंसिद्ध आहे तसं पितृत्व नाहीं! तें तर्कसिद्ध आहे. समजलां? म्हणून मी बापाचं नांव लावीत नाहीं." इतरांप्रमाणें प्रीतमसुद्धां त्याच्या सडेतोड विचारसरणीबद्दल नि तत्त्वज्ञानाबद्दल मोठें कौतुक करी. पण मालतीनें मोका साधून त्याचे चांगले डोळे उघडले, तेव्हां रमेशचें खरें स्वरूप प्रीतमला दिसलें!

मालती म्हणाली, " रमेश पेटकर बापाचें नांव लावत नाहीं, त्याला निराळें कारण आहे. तत्वज्ञानाच्या नि सिद्धांताच्या नुसत्या थापा आहेत थापा ! "

" निराळं कारण म्हणजे कुठलं ? " प्रीतमनें प्रश्न केला.

" ती मोठी गंमतीची गोष्ट आहे. " मालतीनें सांगायला सुरवात केली. " रमेशचा बाप एका साबणाच्या कारखान्यांत मॅनेजरच्या हाताखालीं कारकून आहे. बोलून चालून कारकून !—मिळून मिळून काय पगार मिळणार ? बढती होत होत आतां कुठं त्यांना नव्वद रुपये मिळूं लागले आहेत ! रमेश लहान असतांना मला वाटतं—कांहीं तरी साठ सत्तर रुपये मिळत होते असतील ! तीन चार मुलं त्यांच्या पदराला ! कसा पुरणार पगार ? तरीसुद्धां पहा, त्यांनीं रमेशला बी. ए. पर्यंत शिक्षण दिलं. बी. ए. झाल्यावर रमेशच्या मनांतून एम्. ए. ला बसायचं होतं, रमेशनं बापाला तसं सांगितलं. "

" मग ? " प्रीतमनें विचारलें.

" तेव्हां रमेशच्या उत्साहाबद्दल त्यांना मोठा आनंद झाला, नि स्वतःच्या दारिद्र्याबद्दल थोडंसं वाईट देखील वाटलं. ते म्हणाले, ' हें पहा, तूं आतां कांहीं लहान नाहींस. आपली आर्थिक परिस्थिति कशी आहे हें तुला कळत नाहीं असं नाहीं. बी. ए. पर्यंतचंच शिक्षण कसं दिलं हें माझं मला माहीत ! वास्तविक तूंच आतां मला थोडी मदत केली पाहिजे. आतां ह्या उतारवयांत तुझा मला

थोडा ना थोडा उपयोग व्हावा, माझ्यावरचा भार तूं हलका करावा, म्हणूनच ना तुला इतकं शिक्षण दिलं ? तुझ्या दोन बहिणी तर आतां अगदीं गळ्यास लागल्या आहेत. त्यांचं लग्नकार्य आतां तूंच केलं पाहिजेस. मग सांग बरं कसं तुला शिक्षण देऊं आणखी ? इतकंहि करून तुला शिकायचंच असेल, तर निदान स्वतःच्या मनगटाच्या जोरावर कमव नि शिक ! मी तुझ्या शिक्षणाच्या आड येत नाहीं. मला मदत नाहीं केलीस तरी चालेल, पण निदान माझ्या मदतीची तरी यापुढं अपेक्षा करूं नको. यांत काय चुकलं रमेशच्या वडिलांचं ? "

" काय चुकलं ? बरोबर म्हणाले ते ! "

" पण रमेशला कुठं आहे अक्कल एवढी ? एकदम त्याचं मस्तक भडकलं ! नाहीं नाहीं तें तो बापाला बोलला ! आणि रागाच्या भरांत घरांतून निघून एका श्रीमंत मित्राकडे जाऊन राहिला. तेव्हांपासून त्याचं म्हणणं असं कीं, जो आपल्याला शिकूं देत नाहीं तो बाप कसला ?—आणि काय म्हणून असल्या बापाचं नांव लावायचं ? "

हें ऐकून प्रीतमला रमेशचा संताप आल्यावांचून राहिला नाहीं. अशा कृतघ्न माणसाला समाजानें हद्दपार कां करूं नये, असाहि एक प्रश्न त्याच्या मनाला चाटून गेला. त्याचें डोकें जवळ जवळ सुन्नच झालें होतें. असलीं बोलघेवडीं भोंदू माणसें समाजांत उजळ माथ्यानें फिरतात, समाज त्यांचें कौतुक करतो, ह्या बद्दल त्यानें मनांतल्या मनांत

समाजाला खूप-खूप शिव्या दिल्या. पण कसलासा विचार एकदम त्याच्या मनांत आला नि त्यानें मालतीला विचारलें.

" पण काय ग मालू, रमेशच्या खाजगी जीवनाशीं नि त्याच्या घरगुती भानगडीशीं समाजाला काय करायचं आहे ? त्याची कर्तबगारी, त्याची विद्वत्ता इत्यादि त्याचे सद्गुण पहायचे सोडून, आपण त्याचं खासगी जीवन कां पहावं ? तहानेलेल्यानं नदींतलं निर्मळ पाणी प्यावं, त्या पाण्याच्या तळचा चिखल कां पहावा ? काय करतो हें पहाण्यापेक्षां कोण करतो हें पहाण्याची आम्हां लोकांना फार वाईट संवय आहे. "

त्याला आणखीहि कांहीं बोलायचें होतें, पण त्याचें वाक्य पुरें होतें न होतें तोंच मालती म्हणाली—

" उलट मी म्हणेन कीं तीच चांगली संवय ! "

" ती कशी ? "

" सार्वजनिक काम करणाऱ्या माणसाला सार्वजनिक नि खाजगी असं दुहेरी जीवन असूंच शकत नाहीं. उलट सार्वजनिक कार्यांत पडलेला माणूस हा पर्यायानें समाजाच्या मालकीचाच आहे. त्याच्या जीवनाचे पापुद्रे अलग अलग करण्याचा अधिकार समाजाला आहे. एकादा सार्वजनिक कार्यकर्ता बाहेरून देवमाणूस दिसला नि आंतून सैतानी वृत्तीचा असला तर त्याला समाजानं चांगला वठणीवर आणलाच पाहिजे—नव्हे अगदीं नेस्तनाबूद करून टाकला पाहिजे. अशा लुच्च्यालफंग्याकडून स्वतःची फस-

वणूक करून घेणं समाजाला शोभणार नाहीं. चांगलं सोनं कान खाऊं लागलं, तर त्या सोन्याचा उपयोग काय ? ”

मालती तावातावानें बोलत होती.

प्रीतम स्तब्धपणें ऐकत होता. ‘रमेशला आपण डोकीवर घेऊन नाचलों; त्याला बडा तत्वज्ञानी नि स्पष्टवक्ता समजून त्याचं कौतुक केलं, तोंड फाटेपर्यंत त्याची प्रत्येकाकडे स्तुति करीत गेलों,—मूर्खपणा केला!’ असा त्याचा त्यालाच पश्चात्ताप होऊं लागला.

प्रीतमं विचारांत पडलेला पाहून मालतीनें त्याला विचारलें—

“ कां ? असा उगी कां राहिलास ? ”

भानावर आल्यासारखें करून त्यानें उत्तर दिलें—

“ छे......उगीच ! ”

फिरून त्याच्या मनाला वाटूं लागलें, मालती मला हें खोटं तर सांगत नसेल ? पण खोटें सांगण्याचें तिला कारणच नव्हतें. रमेश कांहीं मालतीचा कोणी शत्रू नव्हता. रमेशची थोरली बहीण मालतीची मैत्रिण असल्यामुळें तिला रमेशची इत्थंभूत माहिती असणें अगदीं सहाजीकच होतें.

“ राग ?......” मालतीनें विचारलें.

“ राग कसला मालू ? ”

“ मग असा उगी कां तूं ?

“ मी विचार करतों आहें. ”

“ कसला ? ”

" सार्वजनिक काम करणाऱ्यांच्या खासगी जीवनावर-सुद्धां समाजाचा हक्क पोंचतो, या तुझ्या विधानानं मी थोडासा बुचकळ्यांतच पडलों आहें. माझं मन मला तसं सांगत नाहीं. "

" नसेल तुला पटत तर सोडून दे. पण तूं मला एक सांग—एकाद्यानं स्वतःच्या दोषांवर पांघरूण घालून केवळ तत्त्वज्ञानाच्या नांवाखालीं वैयक्तिक सूड उगविण्यासाठीं आपल्या आईच्या शीलाविषयीं शंका घेण्यापर्यंत माणूसकी सोडावी, हें तुला योग्य वाटतं का ? अशा माणसाला तूं माणूस म्हणशील का ? " तिनें विचारिलें.

" नाहीं. " प्रीतम उद्गारला.

" संपलं तर ! " मालती मोठमोठ्यानें हंसूं लागली.

# झुणका-भाकर

पोट प्रांतांत झालेल्या भयंकर दंग्याची अंगावर शहारे आणणारी बातमी नुकतीच बाहेर आलेली आहे. हा दंगा नवराबायकोच्या क्षुल्लक भांडणावरून विकोपास गेलेला असला, तरी त्याचे परिणाम पोट प्रांतस्थ सर्व नागरिकांस चांगलेच भोगावे लागले यांत शंका नाहीं. या दंग्याच्या मुळाशीं असलेले धागेदोरे फारच गुंतागुंतीचे असल्यानें ती सर्वच हकीकत वाचकांना सादर केल्याशिवाय गत्यंतर नसल्यानें ती लांबलचक गंमतीची बातमी जशीच्या तशीच येथें देणें भाग पडत आहे.

तें असें झालें, कीं त्या दोघांचें लग्न नुकतेंच मारे तडाखेबंद थाटांत झालें होतें. त्यांचा तो प्रीतिविवाहच होता म्हटलें तरी चालेल. कारण त्या उभयतांचें परस्परांवर इतकें

निस्सीम प्रेम होतें कीं, लैलामजनू, शिरनफरहाद, रोमियो-ज्युलिएट, फार कशाला अगदीं रामसीतेच्या पवित्र जोड्या-प्रमाणें त्यांचा जोडा ( पायांतला नव्हे ) छान शोभायचा. अशा प्रेमळ पतिपत्नींत असा भयंकर मारामारीचा कधीं-काळीं प्रसंग उद्भवेल, असें स्वप्नांतहि कुणाला वाटलें नव्हतें. परंतु आपल्या कल्पनेंतसुद्धां नसणाऱ्या गोष्टी आकस्मिकपणें कशा घडतात, याचें हें अगदीं गरमागरम उदाहरणच होय.

हरबरा संस्थानचे सर्वाधिकारी श्रीमंत चणे यांचे चिरंजीव श्री. झुणकाराम व ज्वारीचे जहागिरदार श्रीमंत जोंधळे यांची लाडकी कन्या भाकरबाई यांचा विवाह ज्या वेळीं पत्रावळ क्षेत्रीं नव्या नवलाईनें झाला, त्यावेळीं झुणकारामचे एकमेव मित्र श्री. कांदे हेहि जातीनें हजर होते. इतकेंच नव्हे तर त्यांच्याच परिश्रमानें आणि अमोल सहाय्यानें झुणकारामच्या राजेशाही डामडौलांत भर पडली होती. ह्या लग्नाचें पौरोहित्य सुप्रसिद्ध विद्वान मद्रासी ब्राह्मण स्वामी मठ्ठा यांजकडे सोपविल्यामुळें त्यांनीं आपली जबाबदारी अगदीं शास्त्रोक्त पद्धतीनें पार पाडल्यामुळें लग्नसमारंभास फारच मजा आला होता.

लग्नाचा प्रसंग म्हणजे आयुष्याची क्रांतीच ती ! अशा बिकट प्रसंगीं दारुसामानाची जाळपोळ करून, आपल्या आतषबाजीचें प्रदर्शन करून, लग्नसमारंभाचें गांभीर्य कमी करण्यापेक्षां, अशा वेळीं वधुवरांस त्यांच्या भावी आयुष्यांत उपयोगी पडेल असा कांहीं तरी भरीव कार्यक्रम ठेवण्याचें

वधुवरांच्या वडीलधाऱ्या माणसांनीं ठरविलें होतें. अनेकांनीं अनेक कार्यक्रम सुचविले, पण शेवटीं सुप्रसिद्ध कीर्तनकार ह. भ. प. गुळाजीबुवा यांचें कीर्तन करविण्याचेंच नक्की झालें.

गुळाजीबुवा म्हणजे अगदीं पट्टीचे कीर्तनकार! गोड भाषेंत रसाळ वर्णनें सांगण्यांत त्यांचा हातखंडाच होता. आणि कलावंतीणीचे वांकडें तिकडें नर्तन न ठेवतां गोड कीर्तन ठेवलेलें पाहून पत्रावळक्षेत्रस्थ वऱ्हाडी मंडळीचा आनंद त्या इवल्याशा क्षेत्रांत मावणें अशक्य झाल्यानें तो पत्रावळीबाहेरहि पाझरूं लागला होता. गुळाजीबुवा यांचें कीर्तन असल्याची बातमी हां हां म्हणतां आख्ख्या पत्रावळीभर पसरली आणि त्या दिवशीं इतकी अलोट गर्दी पसरली कीं अगदीं गांव 'हाऊस फुल्ल' झालें. उगीच भलतीकडे न जाणारी व अत्यंत खाष्ट आणि तिखट स्वभाची म्हणून प्रत्येकाच्या परिचयाची असलेली गंगाभागीरथी चटणीकाकूहि त्यावेळीं सर्वांच्या आधीं तांबड्या मुगाऱ्यासह सोंवळ्यानेंच एका बाजूला येऊन बसली होती. गुळाजीबुवांनींहि आपल्या कीर्तनप्राविण्यानें सर्वांस चाट करून सोडलें व त्या शुभकार्यास फारच गोडी आणली.

असा तो थाटामाटाचा लग्नसोहळा अद्यापि त्या जोडप्याच्या स्मृतींतून नाहींसाहि झाला नसेल. एवढ्यांत झुणकाभाकरमध्यें असा भयंकर आणि रोमांचकारी दंगा व्हावा. हा दैवदुर्विलासच नव्हे तर काय?

खरें सांगायचेंच तर झुणकाभाकर या पतिपत्नीचें एकमेकांवर अगदीं आत्यंतिक प्रेम होतें. त्यांच्या त्या पवित्र प्रेमापुढें नागपूर येथील मोतीतलावांत जीव देणाऱ्या प्रणयी जीवाचें उत्कट प्रेमहि फिकेंच पडलें असतें. झुणकाराम हा पिठल्यापेक्षांहि पिंवळा व तेजस्वी तरुण असल्यानें भाकरबाईचें त्याच्यावर केवळ सौंदर्योद्भव प्रेम होतें. परंतु त्याचा तो गुळमुळीत, चिकचिकीत तर कधीं कधीं फळफळीत स्वभाव तिला मुळींच आवडत नसे. खुद्द भाकरबाई तशी दिसायला सुंदर नव्हती तरी चंद्राचा आकार तिच्या रोमरोमांत भरलेला होता. प्रकृति दिसायला अगदीं सडपातळ आणि तोळामासा होती, तरी ती काटक होती. लहानपणापासून तिला व्यायामाची आवड असल्यामुळें— नव्हे व्यायाम घेत घेतच लहानाची मोठी झाल्यामुळें तिचें शरीर इतकें लवचिक झालें होतें, कीं तिच्या अंगाच्या वाटेल तितक्या घड्या होत असत.

अशी दिसायला नाजुक आणि कृतीनें साजुक असलेली पत्नि आपणांस लाभली म्हणून झुणकाराम स्वतःला भाग्यवान समजत असे! परंतु तो जेव्हां आपल्या लाडक्या पत्नीसह पोट प्रांतांत येऊन राहिला त्यावेळीं त्याचें आणि तिचें कांहीं तितकेंसें पटेना. शिवाय आपला मित्र श्री. कांदे याचा व आपल्या पत्नीचा कांहीं तरी अनैतिक संबंध असावा असाहि संशय झुणकारामला दाट येऊं लागला. आणि तो श्री. कांदे याचा उघड उघड द्वेष करूं लागला. वास्त-

विक झुणकाराम आणि कांदे हे अगदीं जानीदोस्त ! परंतु प्रेयसीचा प्रश्न येतांच जिगरदोस्तहि आपले पूर्व संबंध विसरून कसे एकमेकांचे कट्टरशत्रू बनतात, याचें हें स्पष्ट उदाहरण होय.

आपल्या पश्चात् आपली बायको श्री. कांदे याच्याशीं गुलगुल गोष्टी करते हें झुणकारामच्या लक्षांत येऊन चुकलें होतें, आणि ती गोष्टहि कांहीं खोटी नव्हती. श्री. कांदे हा गोरागोमटा, दिसायला पाणीदार व मजबूत बांध्याचा दमदार तरुण होता. त्याच्या भरघोस बांध्यावर व कणखर-पणावरच खरें म्हटलें तर ती फिदा झाली होती. कोणीकडे लुसलुसीत आणि गुबगुबीत झुणकाराम आणि कोणीकडे तालीमबाज गडी श्री. कांदे ! परंतु स्त्रियांची मनो-रचना माहीत नसणाऱ्या झुणकारामचें मात्र श्री. कांदे यांस पाहून पित्त खवळूं लागलें. झुणकारामनें तसें आपल्या पत्नीकडे उघड उघड बोलूनहि दाखविलें. परंतु भाकरबाई बरी निमूटपणें ऐकून उगी राहील ? तिनें ताडकन् विचारलें, ' कां हो काय झालं मी कांद्यांच्याबरोबर बोललें–चाललें तर ? तें कांहीं नाहीं, मी श्री. कांदे यांच्याशीं पूर्वीप्रमाणंच वागणार ! मला नाहीं तुमचा असला पिर-पिरा स्वभाव आवडत. मेले किती त्रास काढायचे तरी ! बायका म्हणजे कांहीं जनावरं नाहींत बरं !—त्यांनाहि तुमच्यासारखंच स्वातंत्र्य पाहिजे. तुम्हीं माझे लग्नाचे नवरे असाल पण त्यांना मी माझे मित्र समजतें. लग्न झालं म्हणजे

मित्र करूं नये हा बाई कुठला मुलखावेगळा न्याय ? '
भाकरबाईनें बिनदिक्कत दिलेलें उत्तर ऐकून झुणकारामच्या अंगांत नवरेपणा संचारला आणि तो पुरुषी आवाज काढून गर्जून बोलूं लागला.

' अग चांडाळणी, त्या कांद्याशीं लघळपणा करायला तुला शरम नाहीं वाटत ? काय त्याच्या त्या अंगाला घाण तरी ! शीः ! ! आणि असल्या पुरुषाशीं तुझा संबंध ! माझ्या पश्चात् पहावं तर तूं आपली कांद्याच्या गळ्यांत गळा घालून बसलेली ! तुला आणि कांद्याला पाहून लोक काय म्हणतात ठाऊक आहे का ? मला हिणवतात मला—चांडाळणी ! ' झुणकाराम गरम झाला.

' काय ?—काय म्हणतात लोक ? जळले मेले लोक ! लोकांना काय मजा बघायला ! आपलं नासं आणि वर जगाचं हंसं ! ! सांगा—काय म्हणतात लोक मला आणि कांद्याला पाहून ? ' भाकरबाई गाल फुगवीत म्हणाल्या.

' काय म्हणतात ?—शरम नाहीं वाटत ? लोक म्हणतात—मला ऐकूं येईल एवढ्या मोठ्यानं लोक म्हणतात कीं, झुणकाभाकरीपेक्षां कांदाभाकरीचा जोडा लक्ष्मी नारायणासारखा दिसतो बरं ! ऐकलंस का कान फोडून नीट ? '

' ऐकलं बरं ऐकलं ! मग त्यांत काय बिघडलं ? लोकांना दिसलं तें त्यांनीं बोलून दाखविलं. लोकांनीं खरं बोलूं नये वाटतं ? भाकरबाईनीं मुद्दामच टोंचून टोमणा दिला.

' अस्सं ! जारिणी तर मग माझ्याशीं लग्न कां केलंस ?'

'तुमचा हा असला मतलबी स्वभाव मला माहीत नव्हता!' भाकरबाईनें अत्यन्त बेपर्वाईनें दिलेलें उत्तर झुणकारामच्या पुरुषी रुबाबास पसन्त न पडून त्याची मिजास उखडली आणि लगेच त्यानें भाकरबाईच्या छातीवर दाण्णदिशी लाथ मारली. बाजूलाच इतका वेळ स्तब्ध बसलेले श्री. कांदे अगदीं श्री. म. वर्ह्यांच्या चालीनें पुढें आले आणि ती नवराबायकोची झोंबाझोंबी सोडविण्याचा प्रयत्न करूं लागले. परंतु इटलीअबिसिनियाप्रमाणें चाललेलें तें नवरा बायकोचें युद्ध कांहीं केल्या थांबेना. श्री. कांदे हा भाकरबाईच्या मदतीला धांवून आला आणि त्याच संतापाच्या तडाख्यांत झुणकारामनें कांद्याच्या पोटांत सुरा भोसकून त्याचा तिथल्या तिथें प्राण घेतला. श्री. कांदे यांचा असा अमानूष खून झालेला पाहून त्या नवराबायकोच्या दंग्यांत कोणीहि पुढें येईना. त्यांच्या त्या दंग्यास अत्यन्त गंभीर स्वरूप येत चाललेलें पाहून चटणीकाकूला मुगटा सांभाळून पळतां पळतां भुई थोडी झाली. सारा पोट प्रांत पालथा घातला आणि शेवटीं गुळाजीबुवांच्या मठांत येऊन ती दाखल झाली. तों काय? त्या दंग्याची हकीकत आणि कांदे यांचा भयंकर रीतीनें झालेला खून ऐकून त्यांच्या अगोदर तिथल्या तिथेंच पाणी झालें होतें. झुणकाभाकरीच्या ह्या आकस्मिक दंग्यामुळें पोटप्रांतस्थ सर्वच सभ्य नागरिकांना अत्यंत तकलीफ पडली. मात्र झुणकारामनें जेव्हां अपानवायूचे विषारी बॉंब

गोळे फेंकण्यास सुरवात केली, तेव्हां पोट प्रांतांतल्या नागरिकांची धाबीं दणाणलींच, परन्तु पोट प्रांताच्या बाहेरील लोकहि नाक मुठींत धरून त्या झुणकारामास हजार शिव्या वाहूं लागले. पण शिव्या देऊन तें युद्ध थोडेंच थांबतें !

ह्या नवराबायकोच्या भांडणास दंग्याचें तीव्र स्वरूप आल्याची बातमी विलायतेहून नुकत्याच आलेल्या एरंडेलसाहेबांच्या कानांवर येतांच त्यांनीं मात्र त्या दंग्याची व आपल्या प्राणाची पर्वा केली नाहीं. बाटलींत बसून एरंडेलसाहेब निघाले ते केवळ शांतता प्रस्थापित करण्यासाठीं व पोट प्रांतातील खळबळ नष्ट करण्यासाठीं त्यांनीं जीवावर उदार होऊन एकदम पोट प्रांतांत बिनदिक्कत प्रवेश केला व आपल्या अंगच्या शौर्यानें त्यांनीं अवघ्या पांच मिनिटांतच्च त्या दंग्याचा बींमोड केला, आणि स्वतःहि एका दरवाज्यानें प्रवेश करून दंगा मोडीत मोडीत दुसऱ्या दरवाजानें बाहेर आले.

त्यांनीं पोट प्रांतांत बरीच धडपड केली व झुणकाभाकरीसह अनेक दंगेखोरांस त्यांनीं नरकवासाची कडक शिक्षा करून त्यांची नरककुंडांत रवानगी केली. अशा तऱ्हेनें ह्या नवराबायकोच्या क्षुल्लक भांडणामुळें झालेल्या भयंकर दंग्याचा घाणेरडा शेवट झाला. मात्र असा भयंकर दंगा नष्ट केल्यामुळें एरंडेलसाहेबांस अनेकांनीं धन्यवाद दिले व आतां तर काय पोट प्रांतांत दंगा झाला रे झाला कीं पहिल्यानें एरंडेलसाहेबांस तांतडीनें बोलावण्यांत येतें !

# न घडलेली गोष्ट

गोष्ट लिहायची होती, म्हणून मी कसलाच विचार न करतां कागद नि पेन घेऊन लिहायला बसलों.

" कसली गोष्ट लिहूं ? " मनाला प्रश्न पडला.

खूप विचार केला, पण विषयच सुचेना. कससंच कथानक आठवेना.

" पुरुरव्याला सोडून उर्वशी एकाएकीं निघून गेली, तशी माझी प्रतिभा मला अकालींच सोडून गेली नाहीं ना ?" मला शंका आली. पुन्हा मनाला वाटलं—" गोष्ट लिहायचीच आहे म्हणून विषय शोधायचा असतो कीं, विषय सुचला म्हणजे गोष्ट लिहायची असते ! "

पण या प्रश्नामुळं माझं मलाच हंसू आलं! कारण " खाण्यासाठीं जगायचं कीं जगण्यासाठीं खायचं ! " या प्रश्नाइतकाच तो प्रश्न अव्यवहार्य होता.

शेवटीं कांहींच सुचत नाहीं असं पाहून मी लिहिण्याचं सगळं साहित्य ठेवून दिलं नि रोजच्या नियमाप्रमाणं झोंपण्यापूर्वी आरशांत तोंड पाहाण्यासाठीं म्हणून आरसा हातांत घेतला.

त्या आरशांत पाठीमागच्या भिंतीवर लटकत असलेल्या रविंद्रनाथ टागोरांच्या तसबिरीचं प्रतिबिंब दिसलं मला. मी मागं वळून तसबिरीकडं पाहिलं—त्या तसबिरीवर कितीतरी धूळ दिसली.

" काय खुळा मी ! आरासा रोज पुसतों. पण तसबीर मात्र महिनेच्या महिने पुसत नाहीं " मी स्वतःला दोष देत स्वतःशींच पुटपुटलों. आरसा जिथल्या तिथं ठेवून आधीं तसबीर साफ केली.

आरशाकडे एकदां पाहिलं—तसबिरीकडेहि तसंच एकदां पाहिलं. परत एकदां आरसा न्याहाळला नि आणखी एकदां तसबिरीकडे टक लावून पाहूं लागलों.

आरसा नि तसबीर !

दोन भांवडं—पण किती अंतर त्या दोघांमधं ! असे अनेक विचार आले माझ्या मनांत—आणि विचार करतां करतां कधीं झोंपलों तें माझं मलाच समजलं नाहीं.

* * *

" दादा ! " तसबिरीनं आरशाला हांक मारली.

" काय ताई ? " निश्चल नजरेनं तसबिरीकडे पहात आरसा म्हणाला.

" दादा, किती रे भाग्यवान तूं ! तुझं भाग्य माझ्या नशिबीं नाहीं का ! अशीच का मी कुठं तरी कोनाकोपऱ्यांत लटकत राहणार ! " असं बोलत असतांनाच तसबिरीच्या डोळ्यांत चटकन् पाणी आलं. बहीण कष्टी झालेली पाहून भावाचं अंतःकरणहि हालल्यावांचून राहिलं नाहीं.

" कसलं माझं भाग्य ताई ! काय म्हणतेस तूं ! " आरशानं लगबगीनं विचारलं.

" कसलं भाग्य ! वाः थट्टा करतोस होय माझी ? "

" नाहीं ताई, थट्टा नाहीं—खरंच विचारतों मी. कसलं माझं भाग्य ! "

" कसलं म्हणजे !—सगळं जग तुझं कित्ती कित्ती कौतुक करतं ! तूं तुझ्या गुणांनीं लहान थोरांना अगदीं मोहून टाकून सगळ्यांचा लाडका होऊन बसला आहेस. पण मी ! माझ्याकडे कुणाचं लक्ष असेल तर शपथ ! कुठं तूं—नि कुठं मी ! "

" हात्तिच्या ! हेंच माझं भाग्य ! वेडी कुठली ! " आरसा मोठमोठ्यानं हंसूं लागला.

" कां हंसतोस दादा ? " तसबिरीनं त्याला विचारलं.

" ताई, खरंच सांगूं का ! तूं अगदींच भोळसर आहेस बघ. "

" म्हणजे ! "

" अग वेडे, हें माझं भाग्य नाहीं.—दुर्भाग्य आहे. " आरसा म्हणाला.

" इश्श !—दुर्भाग्य ? कांहींतरीच काय रे बोलतोस असं ? "

" कांहींतरीच नाहीं ताई, अगदीं खरं बोललों मी. "

" कसं ? "

" हें पहा, तूं ज्याला भाग्य म्हणतेस, तें माझ्या दृष्टीनं दुर्भाग्य आहे. अग वेडे, मी इतका जगाचा लाडका कसा झालों, हें ठाऊक आहे का तुला ? "

" अं—हं ! " तसबिरीनं मान हालवीत उत्तर दिलं.

" ऐक—" आरशानं सांगायला सुरवात केली.

" तुझ्यांत नि माझ्यांत फार महत्वाचं अंतर आहे. माणसाची ध्येयनिष्ठा तुझ्या अंगीं बाणलेली आहे, तर मी–लांगूलचालन करणारा लाचार होऊन जगतों आहे."

" लाचार ? आणि तो कसा काय ? तिनं मधंच प्रश्न केला.

" पहा—जो माझ्यासमोर येतो, त्याचा मी होऊन जातों. मला माझं स्वतःचं असं कांहींच नाहीं. पोटासाठीं वारा येईल तशी पाठ फिरवणारा एखादा ध्येयशून्य माणूस नि मी सारखाच ! भेटेल त्याच्यासारखं होणं, मिळेल त्याच्याशीं मिसळून एक जीव बनणं, एकदां ह्याच्यासारखा, तर एकदां त्याच्यासारखा—ही माझी पोटभरू वृत्ति. आणि ह्याच माझ्या गुणामुळं लोकांना मी आवडतों. जगांत सुखानं जगण्याची इच्छा असणाऱ्याला असंच वागावं लागतं. व्यवहारी जगांत जगण्याची कला आहे ही ! मला

स्वत्व नाहीं—सुखासाठीं—लोकप्रियतेसाठीं जसा बनवावा तसा बनतों मी ! आणि यालाच तूं भाग्य म्हणतेस का ?"

"भाग्य नव्हे तर काय हें ?"

इतकं सांगूनसुद्धां तसबिरीच्या डोक्यांत प्रकाश पडला नाहीं, हें पाहून आरसा पुन्हां तिला समजावून सांगण्यासाठीं म्हणाला—

"हें भाग्य नव्हे,—भाग्याचा नुसता आभास—भाग्याचं विडंबन ! खरी भाग्यवान जर कोण असेल, तर ती तूं !"

आपल्याला भाग्यवान ठरविणाऱ्या आरशाचं तिला आश्चर्य वाटलं, तिनं विचारलं—

"मी कशी भाग्यवान ? एखाद्या कोनाकोपऱ्यांत कसं तरी आयुष्य कंठणं, हें का भाग्याचं लक्षण ? तूं आणि मी—आम्ही आवळीजुवळीं भांवडं, पण तूं दगडाच्या एका तुकड्याप्रमाणं देव होऊन बसलास, तर मी दुसऱ्या तुकड्याप्रमाणं पायरी होऊन पडलें आहे. देवाकडे जाणारा प्रथम पायरीवर पाय ठेवून जातो नाहीं का ? तसंच—अगदीं तसंच तुझं माझं आहे. उठल्या सुटल्या तुझंच कोडकौतुक करणाऱ्या जगाला माझ्याकडे लक्ष द्यायला वेळसुद्धां मिळत नाहीं. खरं सांगायचं म्हणजे तुझ्या माझ्यांत देवा दगडाइतकं अंतर आहे."

"—पण देवाची नि पायरीची सारखीच आवश्यकता असते. हें विसरलीस तूं ताई ? आणि म्हणूनच उपयुक्ततेच्या बाबतींत तूं नि मीं—आपण आपपल्यापरी सारखींच

महत्वाचीं आहोत. तुझ्या दृष्टीनं मी भाग्यवान नि माझ्या मताप्रमाणं तूं भाग्यवान! असलेल्याचं महत्व नसणं नि नसलेलं महत्वाचं वाटणं हा मानवी स्वभावधर्मच आहे नाहीं?"

आरसा सारखा बोलत होता, तसबीर निमूटपणें ऐकत होती.

"ताई, तुला तुझं सत्व आहे. क्षणाक्षणाला रंग बदलण्याची मतलबी दुनियेची कला तुझ्या सरळ नि सालस स्वभावाला पटणार नाहीं. तुझं स्वरूप, तुझीं मतं कायम आहेत तर मी 'पानी तेरा रंग कैसा? जिसमें मिलावे ऐसा!' अशा वृत्तीचा आहे. 'वांकेन पण जगेन' हें माझं ब्रीदवाक्य! तर 'मोडेन पण वांकणार नाहीं' हें तुझं ब्रीदवाक्य! आणि ताई, चार भिंतीच्या मर्यादेंत का असेना, पण तुला निश्चित असं स्थान आहे. आणि मला? सगळं जग मला मोकळं असलं, तरी मला कुठं हक्काचं स्थळ आहे का? स्थानभ्रष्ट गडगडत्या दगडापेक्षां, खबरदारींतली का होईना, पण शीळा होणं अधिक बरं नाहीं का? ताई, तुझा जन्म मला लाभला असता, तर ध्येयनिष्ठ माणसाला करावा लागणारा स्वार्थत्याग नि सोसावे लागणारे कष्ट मी मोठ्या आनंदानं सहन केले असते! पुढचा जन्म मागेन तेव्हां तसबिरीचा मागेन!

तसबिरीला तें पटलं. तिला आपल्या जन्माबद्दल धन्यता वाटली.

" खरंच दादा, मला माझ्या जन्माची ओळख पटली. आत्मनिरीक्षण करण्याची संवय नसलेल्या माणसाची अशीच फसगत होते. खरंच दादा, तूं कित्ती कित्ती रे शहाणा—! "

आरशाजवळ जाण्यासाठीं म्हणून ती पुढं झाली, आणि—

*          *          *

" खळ्ळ ! "

टागोरांची तसबीर दोरी तुटल्यामुळें खालीं पडली, नि त्या आवाजानें मी एकदम दचकून जागा झालों.

स्वप्न अपुरें राहिलें ! आणखी किती वेळ मी त्या स्वप्नांत गुंग झालों असतों कोण जाणे !

न घडलेली गोष्ट घडली.—स्वप्नांत घडली !

किती गोड स्वप्न तें ! अशीं स्वप्नें रोज रोज पडतील तर किती गंमत होईल ?

दोन मनांचा—दोन मतांचा परस्पर विरोधी झगडा चालला होता तो ! मानवी स्वभावांतील स्वाभाविक प्रवृत्ती त्यांच्या संवादांत प्रामुख्यानें प्रतीत होत होती.

' असं स्वप्न मला कां बरं पडावं ? यांत माझी भूमिका कोणती ? मी तसबीर कीं आरसा ?—कीं कोणीच नव्हे ? '

असा किती तरी विचार केला मी मनाशीं. पण माझें मन मला उत्तर देईना. तसबीर नि आरसा यांच्या तात्विक चर्चेंत माझें मन अगदीं गर्क होऊन गेलें होतें. अगदीं स्तब्ध राहिलें होतें.

आरशाच्या बोलण्यांतील तात्विकता मला पटली, तशी तसबीरीच्या बोलण्यांतील स्वाभाविकताहि मला खरी वाटली. आणि म्हणूनच माझें मन एकदां आरशाकडे तर एकदां तसबीरीकडे हेलकावे घेऊं लागलें. पण नक्की निकाल कांहींच ठरेना.

आरसा नि तसबीर !!

मी आरशाकडे नि तसबिरीकडे अर्थपूर्ण नजरेनें एकदां पाहिलें—नि झालेला वृत्तांत लिहून काढला.

पहातों तों गोष्ट तयार !

नांव दिलें "न घडलेली गोष्ट !"

ही न घडलेली गोष्ट पाहून मला मात्र एक प्रश्न पडतो कीं, मीं तसबीर होऊं कीं आरसा ?

# वेडी बायको

शालूची आणि भगवानची नवीनच गट्टी जमलेली होती हें लक्ष्मीच्या लक्षांत केव्हांच येऊन चुकलें होतें. पण भगवानच्या करड्या दराऱ्यामुळें 'हूं' म्हणायचीसुद्धां बिचारीला चोरी झाली होती. शालूनें भगवानबरोबर नित्य नेमानें घरीं यावें, चहापाणी प्यावें आणि गप्पागोष्टी संपल्यावर सावकाश निघून परत आपल्या घरीं जावें, असें हल्ली रोज चाललेलें पाहून लक्ष्मीच्या अंतःकरणांत किती तर्ककुतर्क येऊन गेले असतील तें न सांगणेंच बरें !

पहिल्या प्रथम ज्या वेळीं भगवानबरोबर शालूनें घरांत पाय टाकला, त्यावेळीं लक्ष्मीनें तिला चांगली नखशिखांत निरखून घेतली. लक्ष्मीच्या त्यावेळच्या दृष्टींत केवढी निरीक्षणशक्ति होती याची निदान पुरुषजातीला तरी

कल्पना येणें कठीण—नव्हे जवळ जवळ अशक्यच आहे. कारण पुरुष पुरुषांकडे किंवा फार तर स्त्रियांकडे एका विशिष्ट तऱ्हेनें आणि तऱ्हेवाईक दृष्टीनें पहात असतील, पण स्त्रियांची दृष्टि याहूनहि अत्यंत निराळी असते. कोणतीहि स्त्री दुसऱ्या स्त्रीकडे इतक्या सूक्ष्म दृष्टीनें न्याहळून पहात असते कीं, ज्या गोष्टी शंभरदां पाहून पुरुषांच्या लक्षांत येणार नाहींत, त्या एका फिरत्या दृष्टिक्षेपांत स्त्रियांना दिसतात.

अशाच भेदक आणि सूक्ष्म दृष्टीनें लक्ष्मीनें शालूला न्याहाळून घेतली !

शालूच्या गालावरची खोल खळगी तिला दिसली, हनुवटीवरची गोंदलेली हिरवट ठिपकी तिनें पाहिली, नाजुक डोळ्यांतला घारेपणा तिच्या दृष्टीस पडला—

परन्तु—

तिच्या मनांत—अगदीं आंत दडून बसलेला तिचा इरादा मात्र लक्ष्मीला दिसला नाहीं.

भगवान हा एका लहानशा खेड्यांत आणि गरिबींतच जन्माला आला होता ! पण मुंबईस आल्यानंतर आपल्या कर्तबगारीवर आणि विद्वत्तेच्या जोरावर त्यानें लोकांवर एवढी दांडगी छाप पाडली कीं, भगवान म्हणजे अत्यंत थोर दिलाचा, शुद्ध आचरणाचा संभावित गृहस्थ म्हणून जो तो त्याला ओळखीत असे.

पण—'अंतरीची खूण राम जाणे !' अशीच त्याची

मनःस्थिति होती हें शेवटपर्यंत कोणासहि कळलें नाहीं. भगवानच्या अंगीं अनेक दुर्गूण होते, पण ते दुर्गूणसुद्धां चंद्रावरच्या डागाप्रमाणेंच शोभादायक आहेत अशीच त्याच्या चहात्यांची बालंबाल खात्री झालेली होती.

तशांत भगवान हा एका वर्तमानपत्राचा संपादक असल्यामुळें, मुंबईतच काय पण उभ्या महाराष्ट्रांत त्याचें नांव आबालवृद्धांच्या परिचयाचें होऊन बसलें होतें. त्यानें अगदीं पहिल्यापासूनच असें बाह्यांगीं निर्मळ दिसणारें वर्तन ठेवलें होतें कीं कुणालाहि त्याच्या अंतरंगाची कल्पना होऊं नये! आणि लोकांना तरी काय ? तेंच पाहिजे !

भगवानच्या एकंदर बाह्य स्वरूपावरून व संभावीत साळसूदपणावरून तो एक सज्जन माणूस असावा असें प्रत्येकाला वाटे.

एकदां कसल्याशा एका समारंभाची जाहिरात देण्यासाठीं म्हणून शालू 'प्रभाव' साप्ताहिकाच्या सज्जन संपादकाकडे म्हणजे भगवानकडे आली आणि त्याच दिवसापासून भगवानची आणि शालूची गट्टी जमली! शालू ही एका मुलींच्या शाळेंत हेड मास्तरीण होती. वयानें म्हणण्यासारखी कांहीं अजून पोक्त झालेली नव्हती. मात्र ती बालविधवा असल्याची खात्रीलायक बातमी कोणा एका 'बातमीदारा'नें संपादक महाशयांस आगाऊच सांगून ठेवल्यामुळें त्यांनीं भोळ्या शालूच्या भाबडेपणाचा भलता फायदा घेण्याचा

क्रम चालविला, आणि शेवटीं तिला आपल्याशीं पुनर्विवाह करायला उद्युक्त केलीच !

*                *                *

लक्ष्मीला भगवानच्या वागण्यांतील तिरसटपणा स्पष्टपणें जाणवूं लागला. 'एकाएकीं तुसडेपणाने वागायला एवढं झालं तरी काय ?' असें भगवानला विचारण्यासाठीं ती संधी साधूं लागली, पण भगवानचा पाय घटकाभर घरांत असेल तर ना !

आतां कुठें सभेलाच जायचें आहे ! मग कुठें साप्ताहिकाचा 'मॅटर' लिहायला कचेरींत जायचें आहे ! अशी कांहीं तरी कारणें सांगून भगवान वेळ मारून नेत असे. आणि बिचारी लक्ष्मी ह्या सार्‍या सबबींवर अगदीं हिंदु स्त्रीच्या साधेपणानेंच आंधळा विश्वास ठेवीत असे.

पण सुपानें कां कधीं सूर्य झांकला जातो ?

भगवानचा हा कठोर कावा लक्ष्मीला कळलाच ! पण कळून तरी काय उपयोग ? पतिदेवांना उलट कसें बोलायचें हा एक पतिव्रतांचा प्रश्न तिच्याहि पुढें होताच ! लक्ष्मीनें आपल्या सहनशीलतेची अगदीं कमाल केली. आणि एके दिवशीं भगवान कोटटोपी घालून बाहेर पडायच्या बेतांत असतांना तिनें मोठ्या मिनतवारीनें भीत भीत विचारलें,—

"माझं ऐकायचं होईल का थोडं ?"

"काय—?" कपाळाला आंठ्या घालूनच भगवाननें प्रश्न केला.

" राग नाहीं ना यायचा पण—?"

आपल्या मनाची खात्री करून घेण्यासाठीं लक्ष्मीनें परत प्रश्न केला.

" हें पहा, सांगायचं आहे का तुला ? उगीच माझा वेळ घेऊं नकोस ! जायचं आहे मला तांतडीच्या कामाला." पायांत स्लीपर घालीत घालीत लक्ष्मीकडे मुळींच न पाहतां भगवाननें उत्तर दिलें.

" कुठल्या तांतडीच्या कामाला ? शालू बाईच्या घरींच ना ? पण मी म्हणतें, शपथ आहे माझ्या गळ्याची ! आज पासून तिकडे जाणं सोडून द्यावं ! " लक्ष्मीनें अगदीं काकुळतीनें सांगीतलें आणि भगवानचा हात धरण्याइतका धीटपणा तिनें दाखविला. पण भगवानला काय त्याचें ? त्यानें तिचा हात झिडकारून टाकला आणि म्हटलें,—

" परत ते शब्द उच्चारशील तर तोंड फोडून टाकीन ! याद राखून ठेव पुन्हां असं बोललीस तर ! असं करूं नये आणि तसं करूं नये, हें तूं कोण मला शिकवणार ? " तोंड वेंगाडून बोलून भगवाननें एका उत्तरांत लक्ष्मीला निरुत्तर केली.

लक्ष्मी भगवानच्या पसंतीस येत नव्हती याचें कारण ती आधुनिक थाटाची स्त्री नव्हती ! पाठीवर लोंबती वेणी टाकून व पदर वाऱ्यावर सोडून लचकत मुरडत चालायला तिला अजून येत नव्हतें ! विश्वबंधुत्वाच्या भयंकर व व्यापक तत्त्वाचा आधार घेऊन वाटेल त्या पुरुषाशीं हस्तांदोलन

करायला तिची मुळींच तयारी नव्हती ! ह्या भयंकर गुन्ह्याबद्दल भगवाननें तिला जन्माचीच शिक्षा देण्याचें ठरविलें होतें.

तरीसुद्धां ‘ एकच प्याल्यां ’तील सिंधूप्रमाणें अखेरच्या घटकेपर्यंत ती ‘ भगवान आज ताळ्यावर येईल, उद्यां ताळ्यावर येईल ’ अशा आशेवरच आपलं आयुष्य कसेंबसें कंठीत होती !

एके दिवशीं...

लक्ष्मीला माहेरीं चालती होण्याबद्दल भगवाननें करडा हुकूम सोडला !

आपण घरांतून निघून गेल्यानंतर भगवानची व आपल्या संसाराची काय स्थिती होईल ? असा एक भयंकर प्रश्न तिच्यापुढें दत्त म्हणून उभा राहिलाच. पण माहेरीं न जावें तरी पंचाईत, जावें तरी पंचाईत. अशा बिकट परिस्थितींत लक्ष्मी पडली ! भगवाननें असें कां सांगितलें हेंहि तिच्या लक्षांत आलें; आणि संतापानें लालबुंद होऊन मनांतल्या मनांत कांहीं तरी पुटपुटत तिनें शाळूच्या नांवानें कडाकड बोटें मोडलीं ! पण हें सारें भगवानच्या नजरेआड ! साऱ्या दुनियेच्या दृष्टीआड ! !

नाइलाज म्हणून लक्ष्मी मुंबई सोडून माहेरीं निघून गेली.

इकडे—आपल्या बायकोचें डोकें ठिकाणावर नसल्यामुळें तिला आपण माहेरी पाठविली आहे, असें सगळ्या लोकांना भगवान सांगत सुटला.

कित्येक हळव्या मनाच्या लोकांनीं भगवानवर कोसळलेल्या ह्या कौटुंबिक—सांसारिक आपत्तीबद्दल सहानुभूति व्यक्त केली.

आपल्या ह्या बेमालूम बातांवर लोकांचा विश्वास बसतो आहे हें जसजसें भगवानच्या लक्षांत येऊं लागलें तस तसा तो ' दुनिया झुकती है, लेकिन झुकानेवाला चाहिये ' ह्या वाक्यावर अधिकाधिक विश्वास ठेवूं लागला !—नव्हे ' दुनिया झुकती है ' हें त्याला पूर्णपणें पटलेंहि !

शालूशीं पुनर्विवाह करण्याचें भगवाननें आतां नक्की केलें होतें. भगवानच्या विरुद्ध असणाऱ्या वर्तमानपत्रांतून त्यासंबंधीं मधून मधून चोरटे हल्लेहि होऊं लागले ! लवकरच ही बातमी लक्ष्मीच्या वडिलांच्या कानावर गेली. लगेच त्यांनीं भगवानला पत्र लिहिलें; पण उत्तर मिळतें कशाला ? शेवटीं बिचाऱ्याला एक पोक्त गृहस्थ मध्यस्थी करण्यासाठीं म्हणून बरोबर घेऊन मुंबईची वाट धरणें भाग पडलें.

भगवान—संपादक ना तो ? तोच जगाची मध्यस्थी करणारा ! त्याची मध्यस्थी करावी कोणी आणि कशी ? मध्यस्थानें एक विचारलें, तर हा सतरा उत्तरें देऊन पार ! कोण बोलणार त्याच्या पुढें ?

लक्ष्मीच्या वडिलांच्या विनवणीचा आणि मध्यस्थाच्या मोलाच्या शब्दांचा भगवानच्या मनावर मुळींच परिणाम झाला नाहीं. मध्यस्थाला मात्र आपला शब्द खालीं पडल्याबद्दल मेल्याहून मेला झाल्यासारखें झालें !

भगवाननें साफ सांगितलें कीं, " तिला मधून मधून वेडाच्या लहरी येतात ! आणि असं असतांना देखील मी दुसरं लग्न करूं नये ? तिच्या वेडेपणाचं प्रायश्चित मी कां म्हणून घ्यावं ? मी माझ्या आयुष्याचं मातेरं कां करावं ? मला संसारसुख घ्यायला तुम्हीं कां बंदी करतां ? तें कांहीं नाहीं ! माझा निश्चय कायम झाला आहे ! "

शेवटीं लक्ष्मीच्या वडिलांना भगवाननें वाटेला लावलें.

शहाणी लक्ष्मी वेडी ठरली !

नवऱ्यानें वेडी ठरवल्यावर कुठल्या हिंदु स्त्रीला समाज शहाणी म्हणेल ?

सर्वांच्या दृष्टीनें लक्ष्मी वेडी ठरली ! आणि ह्या अन्यायाबद्दलच लक्ष्मीच्या अंगाची लाही लाही व्हायला लागली. " पक्षपाती समाज ! नादान पुरुष !! दुबळी स्त्री जात !!! " असे चमत्कारिक शब्द तिच्या तोंडून निघूं लागले. जगाच्या ह्या अन्यायी वर्तनाबद्दलच ती संतापानें काय वाटेल तें बडबडत सुटली !

परंतु ह्या तिच्या बडबडण्यानें, तिला खरोखरच वेड लागलें आहे, अशी लोकांची खात्री होण्यापुरताच उलटा उपयोग झाला !

शेवटीं—

भगवानच्या ह्या विचित्र वर्तनाचा सतत विचार करून करून लक्ष्मीच्या मेंदूवर भलताच परिणाम झाला !

आणि—? अरेरे !

लक्ष्मी खरोखरच वेडी बनली !

लुच्चा, लफंग्या भगवान खराखुरा संभावीत ठरला !

त्यानें शालूशीं लग्न केलें आणि त्यांचे फोटोहि वर्तमान-पत्रांतून चमकूं लागले !

आणि—लक्ष्मी—? काय करणार बिचारी ?

भगवान शालू एकत्र असलेला फोटो हृदयाशीं घट्ट धरून बसते ! आणि म्हणते—

“ नाहीं—मी वेडी नाहीं ! ”

# मा. कृ. शिंदे

## यांचें आतांपर्यंतचें वाङ्मय.

**गांधी महात्म्य**—म. गांधींचें ओवीबद्ध लघुचरित्र.

**मोहनमाळ**—कवितासंग्रह.

**बंडखोर कुमारी**—सामाजिक नाटक.

**गृहलक्ष्मी**—सामाजिक विनोदी नाटिका.

**देवपूजा आणि इतर गोष्टी**—१ ला लघुकथा संग्रह.

**गुंतागुंत**—सामाजिक विनोदी नाटक.

**बनावट बायको**—साद्यंत विनोदी नाटक.

**ठिणग्या आणि टिकल्या**—२ रा लघुकथा संग्रह.

: पटकथा :

**सच्चा सपना**

( हिंदी बोलपट )

: संवाद, पदें :

**देशसेवा, देशाची हांक, प्रगति.** ( प्रचार चित्रपट )

— आगामी नाटकें —

**पट्टराणी, प्राणनाथ, पोटासाठीं, पुढारी, हीच मुलीची आई, अर्थाचा अनर्थ.**

म. ग्रं.
क्र. २८६० ... १२ ...
वि. कथा